रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३०४
www.ramprahar.com
गुरुवार, २२ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

पावसात होर्डिंगचा आसरा न घेण्याचे आवाहन/३
माझे वन योजनेचा आज शुभारंभ/५
चारित्र्यावर संशय घेतल्याने पत्नीने केला पतीचा खून/७

## ‘शेतकऱ्यांना बियाणे, खतांचा तुटवडा भासणार नाही’



**मुंबई :** राज्यामध्ये आवश्यक तेवढा बियाण्याचा आणि खतांचा साठा उपलब्ध असून बियाणे आणिखते याचा कुठलाही तुटवडा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना भासणार नाही. साधारणपणे मागील वर्षांचा कल पाहता कुठले पीक कुठे कमी-अधिक प्रमाणात घेता येईल, याचा विचार करूनच त्या ठिकाणी बियाण्यांची उपलब्धता करून देण्यात आलेली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. खरीप हंगाम आढावा बैठकीसंदर्भातआयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस यांनी बोगस बियाण्यांवर आळा घालण्यासाठी ‘साथी’ पोर्टल, खताच्या लिंकिंगबाबत कडक कारवाई, कीड व्यवस्थापनासाठी डिजिटल शेतीशाळा, शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र - ‘महाविस्तार’ ॲप, सिबिल स्कोअरची अट नाही, अशा विविध शेतीविषयक बाबींवर माहिती दिली.

# राज्यात जमीन मोजणी फक्त २०० रुपयांत

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

केवळ २०० रुपये मोजणी शुल्क भरून एकत्र कुटुंबाच्या जमिनीचे नोंदणीकृत वाटणीपत्र व नकाशे देण्याचा अतिशय महत्वाचा निर्णय राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

गावात भावकीत अथवा बांधावरून वाद काही नवा नाही. बांधावरून महाभारत हा गावकीच्या रहाटगाड्यातील रोजचाच प्रश्न आहे. त्यावरून कुरबुरी होतात. पार माराकुट्या होतात. प्रकरण प्रशासकीय दालनात गेल्यावर मग मोजणीचे भूत मानगुटीवर बसते. मोजणीचा खर्च पाहून मग शेतकरी धास्तावतो. शिवाय जमिनीची खरेदी विक्री असू द्या अथवा न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतरची मोजणी प्रक्रिया असू द्या. त्यासाठीचे



शुल्क अधिक, जादा असल्याचा सूर निघतोच. आता जमिनी मोजणी बाबत राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मोजणी शुल्कात मोठी कपात करण्याचा निर्णय महसूलमंत्री बावनकुळे यांनी जाहीर केला आहे.

केवळ २०० रुपये मोजणी शुल्क भरून एकत्र कुटुंबाच्या जमिनीचे नोंदणीकृत वाटणीपत्र व नकाशे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांवर आर्थिक भार पडू नये, हा यामागील उद्देश आहे.पूर्वी हिस्सेमोजणी शुल्क एक हजार ते चार हजार रुपये प्रति हिस्सा आकारण्यात येत होते. हे शुल्क आता थेट २०० रुपयांवर आणण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा मोजणी खर्च वाचणार आहे.

### मोजणी प्रक्रिया ऑनलाईन

भूमी अभिलेख कार्यालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करता येते. पूर्वीसारख्या कार्यालयात खेटा मारण्याची गरज नाही. एका क्लिकवर काही कागदपत्रांसह शुल्क भरून जमीन मोजणीसाठी अर्ज करता येतो. केवळ २०० रुपये मोजणी शुल्क भरून एकत्र कुटुंबाच्या जमिनीचे नोंदणीकृत वाटणीपत्र व नकाशे देण्याचा अतिशय महत्वाचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांचा मोजणी खर्च वाचणार आहे.

# देशातील नागरिकांनी इतिहास, संस्कृती व महापुरुषांचे कार्य समजून घ्यावे -मधु चव्हाण

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त भाजपचे ‘सामाजिक पर्व’; जिल्हा कार्यशाळा उत्साहात




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देश घडवायचा असेल तर देशातील नागरिकांनी आपल्या इतिहासाची, संस्कृतीची आणि महान व्यक्तींच्या कार्याची जाणीव ठेवली पाहिजे, असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार मधु चव्हाण यांनी बुधवारी (दि.२१) येथे केले.

भाजपकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त २१ ते ३१ मे या कालावधीत सामाजिक पर्व म्हणून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून अहिल्यादेवींच्या समाज सुधारणेतील योगदान, प्रशासनातील पारदर्शकता, महिला सक्षमीकरणासाठीचा दृष्टिकोन आणि सांस्कृतिक वारसा यांचा नव्या पिढीला परिचय करून देण्याचा भाजपचा प्रयत्न असून त्या अनुषंगाने उत्तर रायगड जिल्हा भाजपच्या वतीने जिल्हा व तालुका मंडल स्तरावर विविध कर्यक्रमांचे आयोजन करून सामाजिक पर्व उत्साहात साजरा केले जाणार आहे. या ’सामाजिक पर्व’च्या नियोजनासंदर्भात उत्तर रायगड जिल्हा भाजपची कार्यशाळा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पार पडली. त्यावेळी प्रमुख वक्ता म्हणून मार्गदर्शन करताना बोलत होते.

व्यासपीठावर भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील, सिद्धार्थ बांठिया, ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर आदी उपस्थित होते. या कार्यशाळेला स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, विविध सेल, मोर्चा, प्रकोष्ठचे पदाधिकारी उपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची माहिती व कार्य तळागाळात पोहोचवण्याच्या दृष्टिकोनातून हे सामाजिक पर्व त्यांच्या जीवनावर आधारित आयोजित करण्यात आले असून त्यामध्ये जिल्हास्तरावर युवक भव्य मेळावा. वेशभूषा स्पर्धा, महिला मेळावा, महिला मॅरेथॉन, बुद्धीजीवी संमेलन, नाटक, पथनाट्य, चित्ररथ, प्रदर्शनी, रांगोळी स्पर्धा, तर मंडल स्तरावर मंदिर घाट व मठ स्वच्छता, महाआरती, शंखनाद, वेद पठण, भक्तीगीत, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, तसेच बूथ स्तरावर स्टिकर व पत्रक वाटप अशी कार्यक्रमे होणार आहेत.

कार्यशाळेवेळी उत्तर जिल्हा भाजपच्या अध्यक्षपदी पुनर्निवड झाल्याबद्दल अविनाश कोळी, तसेच जिल्ह्यातील तालुका मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, भूपेंद्र पाटील, सुमित झुंझारराव, दशरथ म्हात्रे, अमर पाटील, विकास घरत, राजेश लाड, प्रसाद भोईर, प्रवीण मोरे, रूपेश धुमाळ, मंगेश वाकडीकर, धनेश गावंड, राहुल जाधव, दिनेश खानावकर, दिनेश रसाळ, नरेश मसणे, सनी यादव यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. **(पान २ वर..)**

## पाऊस, गुळगुळीत रस्त्यामुळे एसटींची धडक

### आठवडाभरात सात अपघात

**महाड : प्रतिनिधी**

महाड-विन्हेरे-दापोली मार्गावर गेली आठवडाभरात सात अपघात झाले आहे. बुधवारी (दि.२१) दोन बस समोरासमोर येऊन धडकल्या आणि अपघात घडला. दोन बसमधील दोन चालक व एक वाहक व नऊ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. तीव्र उतार आणि डांबरी गुळगुळीत रस्ता यामुळे पहिल्याच पावसामध्ये वाहने घसरून एकमेकांवर आदळत असल्याचे स्पष्ट होत आहे.

महाड दापोली राज्य मार्गावर पडणाऱ्या पावसामुळे तीव्र उतारावर वाहने घसरून अपघात होत आहेत. मागील आठ दिवसात या मार्गावर एसटीचे दोन तर इतर वाहनांचे असे एकूण सात अपघात झाले आहेत.

सातत्याने पाऊस पडत आहे. गुळगुळीत रस्ता झाल्याने वाहन चालकांचा वेगदेखील अधिक असल्याने वाहने नियंत्रणात आणणे कठीण जात आहे यामुळे हे अपघात होत असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.

**(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

## बस-कारची भीषण धडक; सहा जण ठार

**अंकली : वृत्तसंस्था**

विजापूर जिल्ह्यातील बसवन बागेवाडी तालुक्यातील मनगोळी शहराजवळ बुधवारी (दि.२१) पहाटे खासगी प्रवासी वाहतूक बस व स्कार्पिओ या दोन वाहनांमध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात एकाच कुटुंबातील चार व दोन वाहनचालक जागीच ठार झाल्याची घटना घडली.

स्कार्पिओ वाहन हैद्राबादहून सोलापूरकडे जात असताना मुंबईहून बळारीकडे निघालेल्या खासगी प्रवासी वाहतूक बसला मनगुळी येथे जोराची धडक बसून भीषण अपघात झाला. अपघातात स्कॉर्पिओ वाहनचालक व प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला.

हे सर्वजण तेलंगणा राज्यातील रहिवासी असून कॅनरा बँक व्यवस्थापक टी. भास्करन, त्यांची पत्नी पवित्रा, मुलगा अभिराम व मुलगी जोशना हे जागीच ठार झाले आहेत. त्यांचा आणखी एक मुलगा प्रवीणतेज गंभीर जखमी झाला असून त्याला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## निवडक

### बंगळुरूमध्ये पावसाचा कहर; पाच जणांचा मृत्यू


**बंगळुरू :** येथे पावसाने धुमाकूळ घातला आहे.



बंगळुरूमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडत असून अनेक घरांमध्ये पाणी शिरले. अनेक भागात वाहने पाण्याखाली गेली. नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात येत असल्याची माहिती मिळत आहे. या नैसर्गिक आपत्तीत आतापर्यंत पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे.

### वादग्रस्त पूजा खेडकरला अटकपूर्व जामीन मंजूर

**मुंबई :** संपूर्ण राज्याला आणि देशाला हादरवून




टाकणाऱ्या पूजा खेडकर प्रकरणात मोठी बातमी आहे. आयएएस परीक्षेत गैरप्रकार केल्याचा आरोप असलेल्या पूजा खेडकर यांना सर्वोच्च न्यायालयाने अटक पूर्व जामीन मंजूर केला आहे. आयएएस परीक्षेत अपंगत्व आणि ओबीसी आरक्षणाचा चुकीच्या पद्धतीने फायदा घेतल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे.

## येत्या सोमवारपासून जंजिरा किल्ला राहणार बंद

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील राजपुरी येथील सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला हा येत्या सोमवारपासून बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे शेवटचा शनिवार, रविवारची सुट्टी साधून असंख्य पर्यटक किल्ला पाहण्यासाठी अलोट गर्दी करतील.



किल्ला पहाण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक आल्याने किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ मोठी गर्दी होते. त्यातच पावसाळा जवळ आल्याने लाटांचा प्रवाह वाढल्याने शिडाच्या बोटी हेलकावे घेत असल्याने किल्ल्यावर उतरणे जिकरीचे झाले होते, परंतु थोड्या संयमाने पर्यटक किल्ल्याच्या प्रवेश द्वाराजवळ उतरावे लागते त्यासाठी नूतन जेटी बांधण्यात आली आहे, परंतु ते पावसाळ्यानंतरच सुरू होणार आहे.

किल्ल्यावर गर्दी होते म्हणूनच असंख्य पर्यटकांनी शिडाच्या बोटींमधून किल्ल्यास प्रदक्षणा घालून किल्ल्याचे रूप बाहेरून पाहण्यात समाधान मानतात. सद्या किल्ल्यावर तिकीट घेण्यासाठीसुद्धा मोठी गर्दी पहावयास मिळते. शेवटचा शनिवार रविवार असल्याने किल्यावर मोठी गर्दी ओसंडून होणार आहे.

शिडाच्या बोटीवर काम करणाऱ्या लोकांना हा शेवटचा रोजगार असून तद्नंतर त्यांना तीन महिने घरीच बसावे लागणार आहे. किल्ल्यामागे नवीन जेटी तयार होत आहे. जेटी झाल्यावर पर्यटकांना किल्ल्यात जाणे सहज सोपे होईल.

## नागरी समस्यांबाबत महत्त्वपूर्ण बैठक

### आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोहिंजण, घोट, कोयनावेळे आणि खुटुकबांधण या गावातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध नागरी सुविधांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत एक महत्त्वपूर्ण बैठक मंगळवारी (दि.२०) आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी संबंधित गावातील समस्या महानगरपालिका अधिकाऱ्यांसमोर प्रभावीपणे मांडल्या. या समस्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन, या समस्या लवकरात लवकर सोडवण्यासाठी पालिका स्तरावर तातडीने प्रयत्न करण्याचे आदेश आमदारांनी दिले. तसेच, येत्या काळामध्ये या समस्यांवर समाधानकारक उपाय काढून त्या मार्गी लावण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

या बैठकीला माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्टे, शहर अभियंता संजय कटेकर, तळोजा मजकूरचे माजी सरपंच संतोष पाटील, विनेश कदम, नितेश पाटील यांच्यासह पनवेल महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## माओवाद्यांचा नेता छत्तीसगडमधील चकमकीत ठार

**गडचिरोली :** छत्तीसगड राज्यातील अबुडमाडच्या जंगलात बुधवारी (दि.२१) सकाळी तेथील डीआरजी पोलीस दलाच्या जवानांशी झालेल्या चकमकीत देशातील नक्षल चळवळीचा सर्वोच्च नेता, पॉलिट ब्युरो सदस्य तथा माओवादी कम्युनिस्ट पार्टीचा महासचिव नंबाला केशव राव उर्फ गगन्ना उर्फ बसव राजू ठार झाला.

या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ट्विटरवरुन छत्तीसगड पोलिसांच्या शौर्याचे कौतुक केले आहे. देशाच्या नक्षलवादाविरुद्धच्या लढाईतील मागील ३० वर्षांत पोलिसांनी माओवाद्यांच्या राष्ट्रीय महासचिवास कंठस्नान घालण्याची ही पहिलीच वेळ आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत मोदी सरकारने नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्याचा संकल्प सोडल्याचा पुनरुच्चार अमित शहा यांनी केला आहे.

## मुंबईतून मालवणात होणार जलवाहतूक

**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी मत्स्य व बंदरे विभागाकडून मुंबईतील माझगावपासून मालवण, विजयदुर्ग, रत्नागिरीपर्यंत जलवाहतूक सेवा सुरू करण्यात येणार आहे. याकरिता एमटूएम बोट वापरली जाणार असून येत्या रविवारी, २५ मे रोजी ती मुंबईतील भाऊचा धक्का येथे दाखल होणार आहे.

दरवर्षी मोठ्या प्रमाणात चाकरमानी मुंबईतून कोकणात जातात. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता, अनेकदा तिकीट मिळत नाहीत. परिणामी निराशा येते. दुसरीकडे मुंबई - गोवा महामार्गाचे कामही अंतिम टप्प्यात असले तरी अद्यापही पूर्ण झालेले नाही. त्यामुळे रस्ते मार्गाने कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांचे खूप हाल होतात. तसेच नियोजित स्थळी पोहचण्यास बराच वेळ लागतो.

दरम्यान, यंदा चाकरमान्यांना कमी वेळेत गावी पोहोचण्यासाठी मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांच्या संकल्पनेतून परवडणाऱ्या दरात जलवाहतुकीचा नवा पर्याय उपलब्ध करून दिला जात आहे. याकरिता

### रत्नागिरीपर्यंत धावणार एमटूएम बोट



एमटूएम ही बोट सेवा प्रायोगिक तत्वावर सुरू करण्याचे प्रयोजन आहे. येत्या २५ मे रोजी ही बोट मुंबईत दाखल होईल. त्यानंतर या बोटीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मत्स्य विभागाकडून पाहणी केली जाईल. मुख्यमंत्र्यांकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर बोट सेवेचा शुभारंभ होईल. विशेषतः गणेशोत्सवापूर्वी ही सेवा सरू करण्याचा मानस आहे, असे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

रामदास बोट दुर्घटनेनंतर कोकणची जलवाहतूक ठप्प झाली होती. आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हायकेट यंत्रणा असलेल्या एमटूएम या बोटीमार्फत पुन्हा एकदा जलवाहतूक सुरू करण्याचा प्रयत्न आहे.

### चाकरमान्यांची परवड थांबणार

गणेशोत्सवात कोकणात जाताना चाकरमान्यांना रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडीने होणारी परवड आणि वेळखाऊ प्रवासाचा त्रास चाकरमान्यांसाठी नेहमीचाच झाला आहे. या त्रासातून दिलासा देण्यासाठी मत्स्य व बंदरे विभागाकडून मुंबईतील माझगावपासून मालवण, विजयदुर्ग, रत्नागिरीपर्यंत जलवाहतूक सेवा सुरु करण्यात येणार आहे.

### परवडतील असे दर निश्चित

मुंबईतील माझगाव डॉक येथून प्रवास सुरू होईल. जवळपास साडेचार तासांत कोकणातील मालवण, विजयदूर्ग तर तीन तासांत रत्नागिरीपर्यंत पोहचता येईल. यासाठी लवकरच चाकरमान्यांना परवडतील असे दर निश्चित केले जातील. त्यामुळे कोकणातील प्रवाशांसाठी हा सुखकर प्रवास असेल, असे मंत्री राणे यांनी म्हटले आहे.

## माथेरानच्या ई-रिक्षांसाठी नवीन नियमावली

### पर्यटकांना दिलासा

**माथेरान : प्रतिनिधी**

प्रसिद्ध पर्यटनस्थळ माथेरानमध्ये केवळ वीस ई-रिक्षा कार्यरत असून कमी ई-रिक्षांमुळे पर्यटकांना तासंतास उभे राहावे लागते. या ई-रिक्षांसाठी एक नियमावली तयार करण्यात आली आहे.

स्थानिक प्रवाशी आणि वेळप्रसंगी त्यांचे पाहुणे असल्यास त्याचप्रमाणे नियमितपणे येणारा परिसरातील व्यावसायिक, व्यापारी वर्ग सुध्दा स्थानिकांच्या रांगेतून पटकन रिक्षातून निघून जातात त्यामुळे अनेकदा स्थानिक आणि पर्यटकांमध्ये वाद होत असतात. यावर तोडगा काढण्यासाठी संघटनेने येथील माथेरान बचाव संघर्ष समिती सोबत चर्चा करून यातून सुवर्णमध्य निघावा यासाठी एक चर्चासत्र आयोजित केले होते.



या वेळी संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, सचिव सुनील शिंदे, उपाध्यक्ष प्रकाश सुतार, माजी नगराध्यक्ष मनोज जुन खेडकर, अजय सावंत, विवेक चौधरी, शिवाजी शिंदे, सुहासिनी शिंदे, प्रियांका कदम आदी उपस्थित होते. त्यामध्ये सर्वानुमते निर्णय घेण्यात आले असून एक नियमावली तयार करण्यात आली आहे. त्याबाबतची अंमलबजावणी २४ मेपासून लागू होणार आहे.

जे स्थानिक लोक आहेत त्यांची वेगळी रांग आणि ज्यांच्याकडे माथेरान रहिवासी पुरावा आहे (रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र) अशांना स्थानिकांच्या रांगेत टोकन दिले जाणार आहे. कुणाचेही पाहुणे आल्यास त्यांनाही पर्यटकांच्या रांगेत उभे राहावे लागणार आहे. जे कोणी शासकीय अधिकारी आहेत ज्यांना ही सेवा मोफत उपलब्ध केली जाते त्यांनाही त्यांच्या कार्यालयापर्यंत न सोडता स्टेशन जवळील ई-रिक्षा स्टँडवर उतरावे लागणार आहे. जेणेकरून त्यांच्यामुळे अन्य प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागणार नाही.ज्यांचा या ई-रिक्षाला विरोध आहे, परंतु अशी मंडळी सर्रासपणे या सेवेचा लाभ घेत आहेत त्यांच्यासाठी एक फॉर्म बनविण्यात येणार असून आमचे ई-रिक्षाला समर्थन आहे आणि ही सेवा अशीच सुरू रहावी असे फॉर्मवर सहीनीशी घेण्यात येणार आहे. त्यामुळे आगामी काळात या सेवेला कुणाचा प्रखर विरोध आहे हे संघटनेला समजू शकते.

नियमावलीमुळे ज्यांचा विरोध आहे अशी मंडळी आपसूकच या सेवेपासून अलिप्त राहतील आणि अन्य प्रवाशांना, ई-रिक्षा समर्थकांना या सेवेचा उत्तम प्रकारे लाभ घेता येईल. एकंदरीत इथे येणाऱ्या पर्यटकांना यामुळे ताटकळत उभे राहावे लागणार नसून उत्तमरित्या प्रवास करता येईल.

# निसरड्या रस्त्यामुळे विन्हेरे मार्गावर एसटींची धडक

## चालकांसह प्रवासी जखमी; घटनास्थळी आठवडाभरात सात अपघात

**महाड : प्रतिनिधी**

महाड-विन्हेरे-दापोली मार्गावर गेली आठवडाभरात सात अपघात झाले आहे. बुधवारी (दि.२१) दोन बस समोरासमोर येऊन धडकल्या आणि अपघात घडला. दोन बसमधील दोन चालक व एक वाहक व नऊ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. तीव्र उतार आणि डांबरी गुळगुळीत रस्ता यामुळे पहिल्याच पावसामध्ये वाहने घसरून एकमेकांवर आदळत असल्याचे स्पष्ट होत आहे.

महाड दापोली राज्य मार्गावर पडणाऱ्या पावसामुळे तीव्र उतारावर वाहने घसरून अपघात होत आहेत. मागील आठ दिवसात या मार्गावर एसटीचे दोन तर इतर वाहनांचे असे एकूण सात अपघात झाले आहेत. बुधवारी सायंकाळी दोन एसटीमध्ये झालेल्या धडकेमध्येदेखील चालकासह अनेक प्रवासी जखमी झाले आहेत.

महाड विन्हेरे दापोली मार्ग हा मुंबई गोवा महामार्गाला पर्यायी मार्ग म्हणून सुरू झाला होता. सन २००५ मध्ये महाडमध्ये आलेल्या महापूरादरम्यान या मार्गाचा अवलंब करण्यात आला होता. त्यानंतर कशेडी घाटामध्ये घाट खचण्याचे प्रमाण वाढले होते अशावेळीदेखील चाकरमान्यांना महाड दापोली, खेड या रस्त्याचा वापर करणे सोयीस्कर झाले होते. यामुळे या मार्गाचे काम अत्यंत चांगल्या पद्धतीने झाले होते.

गेले अनेक वर्षांमध्ये सातत्याने होत असलेल्या देखभाल दुरुस्तीमुळे हा रस्ता अत्यंत गुळगुळीत आणि प्रवासाला सुखकर होता. डांबरी रस्ता असल्याने या मार्गावरून वाहनाची वर्दळ देखील वाढली होती, मात्र गेली आठवडाभरामध्ये सातत्याने पाऊस पडत असल्याने पाण्यामुळे वाहने घसरण्याचे प्रमाण वाढले आहे. गुळगुळीत रस्ता असल्याने वाहन चालकांचा वेग देखील अधिक असल्याने वाहने नियंत्रणात आणणे कठीण जात आहे यामुळे हे अपघात होत असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्यासाठी रस्त्यावर खडी टाकून रोलर खाली दाबण्याच्या अजब प्रयोग सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आला होता. त्यानंतर देखील एक ट्रक घसरून झालेल्या अपघातात झाला. आज सायंकाळी पडणाऱ्या पावसामध्ये दोन एसटीचा समोरासमोर अपघात होऊन प्रवासी जखमी झाले आहेत. फौजी अंबावडे पुणे आणि महाड फौजी अंबावडे या दोन एसटी बसेसची समोरासमोर टक्कर झाली. या बसेस च्या अपघातात चालकासह काही प्रवासी जखमी झाले आहेत.

***अपघात स्थळांवर स्पीड ब्रेकर***

*महाड- दापोली राज्य मार्गावर अपघात स्थळावर स्पीड ब्रेकर टाकण्याच्या नव्या प्रयोगामुळे पुन्हा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अवकाळी पावसामुळे टाकण्यात आलेले स्पीड ब्रेकर व त्यावर घाईघाईने मारलेले पांढरे पट्टे पावसाच्या पाण्यात वाहून गेल्याने नेमका स्पीड ब्रेकर कुठे आहे हे नवीन वाहन चालकांना कळत नसल्याने या स्पीड ब्रेकरमुळे पुन्हा एकदा मोठा अपघात होण्याची शक्यता वाहन चालकांकडून व्यक्त केली जात आहे. गतीरोधक असल्याचे सूचनाफलक लावले नसल्याने पावसामध्ये डांबरावरील हे गतिरोधक दिसून येत नाहीत. यामुळे अपघातांची मालिका सुरूच राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.*



## पालीत अवकाळी पावसाने पाणी व चिखल घरात

**पाली: प्रतिनिधी**

अवकाळी पावसाचा फटका सर्वांनाच बसला आहे. पालीतील बल्लाळेश्वर नगर मधील सचिन मराठे यांच्या घरामध्ये अवकाळी पावसाचे पाणी, चिखल, गाळ व राडारोडा शिरला त्यामुळे त्यांचे प्नुकसान झाले.

येथील ग्रामीण रुग्णालयाचे काम सुरू आहे. त्यामुळे तेथील पाण्याचे प्रवाह बंद झाले आहेत. आणि हे पाणी वाहून सचिन मराठे यांच्या घरामध्ये आले. तसेच तेथील सर्व गाळ चिखल देखील त्या पाण्यासोबत वाहून आला. परिणामी सचिन मराठे यांच्या घरातील वस्तू भिजल्या आहेत. त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच हा सर्व गाळ आणि राडारोडा काढायला त्यांना खूप त्रास झाला.

याबाबत त्यांनी नगरपंचायत मुख्य कार्यकारी अधिकारी विद्या येरुणकर यांना कळवले असता त्यांनी सांगितले की आम्ही संबंधित ग्रामीण रुग्णालय प्रशासनाला याबाबत माहिती देतो. सचिन मराठे यांनी सांगितले की आम्हाला नुकसान भरपाई मिळावी व येथील राडारोडा काढावा. तसेच येथील गटार ओव्हळाचे मार्ग देखील मोकळे करावेत.



## पशुसंवर्धन विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्यांचा सत्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत मंगळवारी (दि.२०) पशुसंवर्धन दिनानिमित्त विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांच्या उपस्थितीत वरसोली येथे संपन्न झाला.



यावेळी सत्कार करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करताना दरवर्षी सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल, तसेच पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना जिल्हास्तरावर भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन सत्यजित बडे यांनी दिले.

रायगड जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र राजपत्रित पशुवैध्यक संघटना व पशु चिकित्सा व्यवसायी संघटना महाराष्ट्र या संघटनाच्या रायगड शाखेने जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडे केली होती. या मागणीची दखल घेत पशुसंवर्धन विभागाने मंगळवारी सत्कार समारंभाचे आयोजन केले होते.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा परिषद पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम, पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. रत्नाकर काळे, पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. अजय कांबळे, राजपत्रित पशुवैध्यक संघटना जिल्हा अध्यक्ष डॉ. मुकेश मर्चंडे, पशु चिकित्सा व्यवसायी संघटना महाराष्ट्र जिल्हाध्यक्ष डॉ. कैलास चौलकर उपस्थित होते.

## रायगडला अवकाळी पावसाचा शनिवारपर्यंत इशारा

**अलिबाग, : प्रतिनिधी**

मंगळवारी (दि.२०) अवकाळी पावसाने रायगड जिल्ह्याला झोडपून काढले. या पावसामुळे रायगडकरांची त्रेधातिरपीट उडाली. जिल्ह्याच्या दक्षिण भागात पावसाचा जोर होता. बुधवारी सकाळी ८.०० वाजेपर्यंत ४६.७२ मिलीमीटर पावसाचे नोंद झाली. रोहा तालुक्यात सर्वाधिक ७८.०० मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

पुढील चार दिवस पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मच्छिमारांनी मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

रायगड जिल्ह्यात मंगळवारी मेघगर्जनेसह ढगाळ वातावरण होते. सायंकाळी सहानंतर जोरदार पाऊस सुरू झाला. जोरदार वारादेखील वाहत होता. वार्यामुळे वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. अचानक पडलेल्या या पावसामुळे रायगडकरांची धावपळ उडाली. जनजीवन विस्कळीत झाले. बुधवारी (दि. २१) देखील अवकाळी पावसाने हजेरी लावली

बुधवारी सकाळपर्यंत ४.७२ मिमी. पावसाची नोंद झाली. पुढील चार दिवस हवामान विभागाने रायगड जिल्ह्याला पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. त्यामुळे रायगड जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सावधगिरीचा इशारा दिला आहे. मच्छिमारांनी मासेमारीसाठी खोल समुद्रात जाऊ नये असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## कर्जत येथे हरवलेला मुलगा पालकांच्या ताब्यात

**खोपोली: प्रतिनिधी**

कर्जत येथे उद्यान एक्सप्रेस मध्ये भेटलेल्या मुलाच्या आई-वडिलांचा शोध दोन तासाच्या आत आई-वडिलांशी संपर्क साधण्यासाठी अपघातग्रस्त ग्रुप व्हाट्सअपद्वारे मदत झाली यावेळी पत्रकार विनीत जाधव, शुभम कंगणे, व वैभव पवार तसेच अपघातग्रस्त ग्रुपचे गुरुभाऊ साठीलकर व हेल्थ फाउंडेशन यांचे सर्वस्व स्तरावर कौतुक होत आहे.

दोन वाजण्याच्या सुमारास उद्यान एक्सप्रेस कर्जत रेल्वे स्थानकात थांबलीअसता एक्सप्रेस मधील काही प्रवाशांनी त्या मुलास कर्जत स्थानकाजवळ सोडले यावेळी कर्ज स्थानकाच्या एक नंबर प्लॅटफॉर्मवर विनीत जाधव उपस्थित होते. त्या मुलाची चौकशी केल्यावर अर्धवट स्वरूपात सांगितली.



उल्हासनगर येथील आकाश कॉलनी महाराणा प्रताप स्कूल येथे राहत आहे असे त्याने सांगितले.

खोपोली येथील अपघात ग्रस्त ग्रुप वर ही माहिती मिळताच या ग्रुपमधील सदस्य शुभम कंगळे यांनी ही माहिती मिळताच उल्हासनगर येथील वैभव पोळ यांच्या कानावर टाकली. उल्हासनगर येथील वैभव पोळ यांनी दीड तासाच्या प्रयत्नानंतर अखेर त्या मुलाच्या मामाशी संपर्क करून त्यानंतर आई-वडिलांची संपर्क झाला

## रोह्यात विजेच्या कडकडाटासह पाऊस

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुकाच्या ग्रामीण भागात बुधवारी सायंकाळी विजेच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला आहे.मंगळवारी सायंकाळी पावसाने सुरुवात केली होती. रात्रभर रिमझिम पाऊस शहरासह ग्रामीण भागात पडत होता.

बुधवारी दुपारी पावसाने विश्रांती घेतली होती. परंतु बुधवारी सायंकाळी विजेच्या कडकडाटासह पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.बुधवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास विजेच्या कडकडात सह पावसाने जोरदार हजेरी शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात लावल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे जनजीवन विस्कळित झाले.

दोन दिवस सायंकाळी सतत पडलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळित झाल्याचे दिसून आले. बाजारपेठेत शुकशुकाट झाल्याचे चित्र दिसले रस्त्यावर मात्र पावसाचे पाणी आल्याने मंगळवारी काही दुकानात पाणी शिरल्याचे चित्र दिसून आले. बुधवारी संपूर्ण वातावरण काळोखमय झाल्याचे दिसून आले. हवेत गारवा निर्माण झाल्याचे दिसून आले. नागरिकांना मात्र उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे.



## अवकाळीने मुरबाड वीजयंत्रणेची हानी



**कल्याण : प्रतिनिधी**

मंगळवारी (२० मे ) सायंकाळी मुरबाड परिसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने वीज वितरण यंत्रणेची मोठ्या प्रमाणात हानी झाली. या नैसर्गिक आपत्तीत उच्च दाब वाहिनीचे जवळपास १३ विजेचे खांब आणि २७ लघुदाब वाहिनीचे खांब कोसळले. तसेच मोठी झाडे पडल्यामुळे ५० ते ६० ठिकाणी वीजवाहिन्या जमिनदोस्त झाल्या. अभियंता, कर्मचारी व कामगारांच्या टिमने युद्धस्तरावर दुरुस्तीचे काम करत रात्री भर पावसात विज पुरवठा सुरळीत करण्यासाठी अथक परिश्रम घेऊन जवळपास २२ हजार ग्राहकाचा विजपुरवठा रात्रीच सुरळीत केला.

## हौसमौज पाण्यात; डोक्यावर छत्री घेऊन मंगलाष्टक

**खोपोली : प्रतिनिधी**

अनाहूत पाव्हण्या सारखा हजेरी लावलेल्या मोसमी पूर्व पावसाने मंगळवारी खालापुरातील अनेक लग्न समारंभातील आनंद हिरावून घेतला. ७२ मिलिमीटर एवढ्या प्रचंड प्रमाणात पडलेल्या बिगर मोसमी पावसाने लग्नातील लाखोचा खर्च वाया गेला.

मे महिना सुरू झाल्यापासून न चुकता थोडा वेळ हजेरी लावणारा पावसाने मंगळवारी मात्र धुमशान केले .एकीकडे लग्नाचा मुहूर्त आणि त्याचवेळी टपकलेला पाऊस यामुळे वऱ्हाडी मंडळी यांची धावपळ झाली. लग्नाचा मुहूर्त टळू नये यासाठी वधू-वर ,भटजी अंतरपाट धरणारे यांच्या डोक्यावर छत्री धरून मंगलाष्टका उरकण्यात आल्या.

लाखो रुपये खर्च करून सजावट केलेला मंडप सोडून आडोशाला लग्न उरकावे लागले. पावसाचे थैमान चार तास सुरू असल्याने नवीन वधूवरांचे मनात आखलेले बेत पाण्यात गेले आता भविष्यात भटजींना विचारून मुहूर्त काढण्या ऐवजी हवामान खात्याला विचारून मुहूर्त काढावा का ? अशी सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे.



पान १ वरुन

## 'देश घडविण्यासाठी इतिहास, संस्कृती व महापुरुषांचे कार्य समजून घेणे आवश्यक'

श्री. चव्हाण यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, अहिल्यादेवी होळकर हे भारतीय इतिहासातील एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी आपल्या कारकीर्दीत आदर्श शासन, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन आणि लोककल्याणाचे अद्वितीय उदाहरण सादर केले. हे 'सामाजिक पर्व' म्हणजे त्यांना दिलेली श्रद्धांजलीच आहे. या कार्यक्रमांमुळे तरुण पिढीला इतिहासाशी नातं जोडून सामाजिक भान निर्माण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त करताना महापुरुषांचा इतिहास कायम स्मरणात रहावे आणि युवा पिढीला प्रेरणा मिळावी, यासाठी असे उपक्रमे महत्त्वपूर्ण असल्याचेही त्यांनी नोंदीत केले. महापुरुषांना एकाच समाजाने मानावे हा समज दूर झाला पाहिजे त्यासाठी प्रत्येक महापुरुषांचा प्रत्येक समाजाने जयंती व इतर कार्यक्रम साजरे केले पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. मते मिळावी म्हणून भाजप कार्यक्रम करत नाही तर तळागाळात सर्व घटकात आपल्या देशाचा गौरवशाही इतिहास पोहचला पाहिजे, यासाठी सतत उपक्रम राबविले जातात, असेही त्यांनी अधोरेखित केले. यावेळी प्रास्ताविकातून जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी सामाजिक पर्वाची तसेच या उपक्रमाच्या संदर्भात नियोजन कमिटीची जबाबदारीची माहिती दिली.





## एक देश एक निवडणूक व्याख्यानात सहभाग

**पनवेल: रामप्रहर वृत्त**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या मुंबई प्रादेशिक केंद्राने आयोजित केलेल्या 'एक देश एक निवडणूक' या विषयावरील राष्ट्रीय व्याख्यानात सक्रिय सहभाग घेतला.

देशामध्ये एक देश एक निवडणूक येणाऱ्या काळामध्ये आवश्यक आहे असे विचार केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी व्यक्त केले. ते इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ दिल्ली येथे बुधवार २१ मे रोजी एक देश एक निवडणूक या कार्यक्रमात वक्ता म्हणून बोलत होते.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे नॅशनल जनरल सेक्रेटरी सुनील बंसल, इग्नूच्या कुलगुरू प्रोफेसर उमा कांजिलाल,प्रादेशिक सेवा प्रभार



च्या निदेशिका प्रो. मनोरमा सिंह, प्रादेशिक केंद्र मुंबई चे प्रादेशिक संचालक डॉ. राहुल मिश्र, सहायक प्रादेशिक संचालक डॉ. मिलिंद पाटिल, सहायक शशांक त्रिपाठी, संजय व् केंद्रच्या विविध विषयात शिकत असलेले विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी केंद्रीय मंत्री यांनी एक देश एक निवडणूक का महत्वाचे आहे व येणाऱ्या काळामध्ये त्याची आवश्यकता का आहे. त्यांनी यावर स्पष्ट मत व्यक्त केले. तसेच भाजपाचे केंद्रीय जनरल सेक्रेटरी सुनील बंसल यांनी सुद्धा एक देश एक निवडणूक या विषयावर महत्वपूर्ण माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना दिली व् त्यांच्या प्रश्नानाची उत्तरे पण विस्तृत स्वरूपात दिली. मुंबई केन्द्रा चे विद्यार्थी श्री शनिदेव तिवारी व् रश्मी प्रिया यांनी बंसल यांना प्रश्न विचारले. कार्यक्रमाच्या यशस्विते साठी केंद्रच्या कर्मचारी यांचे योगदान महत्त्वपूर्ण होते.

# पावसात होर्डिंगचा आसरा घेऊ नका!

## पनवेल महापालिकेकडून नागरिकांना आवाहन

पनवेल : रामप्रहर वृत्त

सध्याच्या पावसाळी वातावरणात वादळी वारा पाऊस असेल तर अशा परिस्थितीमध्ये मोठमोठ्या होर्डिंगच्या, जाहिरत फलकाखाली किंवा होर्डिंगजवळ उभे राहू नका, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी पनवेल महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील नागरीकांना केले आहे.

महानगरपालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी, विविध आकाराचे आणि उंचीचे जाहिरत फलक उभारण्यात आलेले आहेत. अनपेक्षितपणे मान्सुनपूर्ववादळ, वाऱ्यामुळे असे जाहिरात फलक पडू शकतात.

यावर खबरदारीचे उपाय म्हणून महापालिकेने यापूर्वीच सर्व जाहिरातदारांना मान्सुनपूर्व कालावधीत सर्व जाहिरात फलकांची प्रत्यक्ष जागेवर जावून तपासणी करणे, त्याचे फाऊंडेशन व्यवस्थित असल्याचे तसेच जाहिरात फलकांच्या लोखंडी सांगाड्यास गंज लागला नसल्याची खात्री करणे, त्यास गंजरोधक रंग लावणे. एखादा जाहिरात फलक धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आल्यास तो तात्काळ निष्कासित करणे, त्यासोबतच जाहिरात फलक वादळ, वारा यामुळे पडणार नाही, यासाठीच्या सर्व उपाययोजना कराव्यात अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

नागरीकांनी मान्सून कालावधीत अशा जाहिरात फलकाच्या खाली अथवा जाहिरात फलकाच्या आसपास थांबण्याचे टाळावे अथवा आपली वाहने लावू नयेत अथवा टपरी, हातगाडी, पत्राशेड लावून कोणी व्यवसाय करीत असल्यास ते ताबडतोब काढून घ्यावे. जेणेकरुन जीवित अथवा वित्तीय हानी होणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन परवाना विभागाचे उपायुक्त प्रसेनजित कारलेकर यांनी केले आहे.

# फसवणूक केल्याप्रकरणी सात जणांवर गुन्हा

पनवेल : वार्ताहर

शेअर्समध्ये गुंतवलेले पैसे आणि त्या पैशांवर मिळणाऱ्या कमिशनची रक्कम न देता फसवणूक केल्याप्रकरणी सात अनोळखी व्यक्तींविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सुनील डांगे हे सेवानिवृत्त असून ते तळोजा फेज वन येथे राहतात. मार्च महिन्यात त्यांना विनिता पटोडिया या अनोळखी महिलेचा मेसेज आला आणि शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवल्यास भरपूर फायदा होईल, असे सांगण्यात आले. त्यानंतर या महिलेने तिच्या सहा साथीदारांच्या मदतीने सुनील डांगे यांना ग्रुपमध्ये जॉईन करून घेतले. इतर लोकांनी पैसे गुंतवल्यावर त्यांना कसा फायदा होतो, हे त्यांना समजावण्यात आले. त्यानंतर डांगे यांनी कमी किमतीचे शेअर्स विकत घेतले.

या वेळी त्यांना फायदा झाल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर ते गुंतवत असलेल्या पैशावर जास्त फायदा होत असल्याचे त्यांना दाखवण्यात आले. त्यामुळे त्यांनी या टोळीने सांगितलेल्या विविध खात्यांवर पैसे पाठवून आणखी काही शेअर्स घेतले. अशा प्रकारे त्यांनी एकूण १० लाख ९१ हजार रुपयांची गुंतवणूक या शेअर्समध्ये केली. त्यानंतर त्यांनी गुंतवलेली रक्कम कमिशनसह देण्याबाबत विचारणा केली असता या टोळीने त्यांना आणखी पैसे गुंतवण्यास सांगून पैसे देण्यास टाळाटाळ केली.

या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार, पोलिसांनी या प्रकरणात सात अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा नोंद केला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# विचित्र अपघातात तरुणाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

अनोळखी वाहन, कंटेनर आणि बुलेट यांच्यात झालेल्या विचित्र अपघातात. २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

ओमकार श्रीकांत शिंत्रे असे या तरुणाचे नाव असून तो कोपरखैरणे, सेक्टर ५ येथे राहण्यास होता. उत्कर्ष पांडे हा ठाणे, वेस्ट येथे राहत असून तो त्याचा मित्र ओमकार शिंत्रे याला सोबत घेऊन त्याच्या बुलेटने इतर मित्रांबरोबर लोणावळा येथे फिरायला गेले होते. लोणावळा येथे फिरून दुपारच्या सुमारास ते घरी यायला निघाले. यावेळी ओमकार शिंत्रे हा उत्कर्ष याच्या मागे बसला होता व इतर मित्र कार मध्ये बसले.

पळस्पे ते जेएनपीटी महामार्गाने ते घरी येत असताना उत्कर्षच्या बुलेट पुढे असलेल्या कंटेनर चालकाने अचानक ब्रेक दाबला. त्यामुळे उत्कर्षने दुचाकीचा ब्रेक दाबला. त्यामुळे उत्कर्षचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने ओमकार व उत्कर्ष दोघे रस्त्यावर खाली पडले. दरम्यान, पाठीमागून येणारे अज्ञात वाहनाचे चाक ओमकारच्या तोंडावरून गेल्याने त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# भाताणमध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन

पनवेल : रामप्रहर वृत्त

ग्रुप ग्रामपंचायत भाताण व भाताण पाडा गावात विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि शुभारंभ भाजपचे नेते, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. पाण्याची टाकी, स्वप्नील भोईर ते अनिल काठावळे यांच्या घरापर्यंत रस्ता व आर.सी.सी. गटार, सभामंडप, नथुराम भोईर ते रमेश घोगरे यांच्या घरापर्यंत रस्ता व आर.सी.सी गटार या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.



या वेळी प्रीतम म्हात्रे यांच्यासोबत माजी नगरसेवक बबन मुकादम, सरपंच तानाजी पाटील, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, भाजप गुळसुंदे विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, कर्नाळा मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, तानाजी खंडागळे, प्रवीण ठाकूर, माजी उपसरंपच गणेश गाताडे, रोहित घरत, दिपक ठाकूर, अरुण पाटील, अनिल काठावळे, किरण मुकादम, स्वप्निल भोईर, महेंद्र गोजे, रूपेश ठाकूर व सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल तालुक्यात मनसेच्या पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

**पनवेल : वार्ताहर**

सध्या राज्यभरात शिंदे शिवसेनेत जोरदार इन्कमिंग सुरू असून पनवेल तालुक्यातील मनसेच्या अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपल्या कार्यकर्ते व मित्रमंडळीसह राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश केला.



शिवसेना सचिव संजय मोरे, खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या मार्गदर्शनानुसार पनवेल शिवसेनेचे महानगरप्रमुख, मा. नगरसेवक प्रथमेश सोमण यांच्या पुढाकारातून मनसेचे महानगर सचिव नितीन काळे, व्यापारी सेनेचे राज्य उपाध्यक्ष पंढरी पवार, विनय कदम, उत्तर रायगड मनसे रोजगार विभागाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रशांत कदम, सुनीता सोनवणे, पनवेलचे उपतालुकाध्यक्ष राकेश भोईर, खारघरचे शहराध्यक्ष प्रणव कारखानीस, पनवेलचे उपतालुकाध्यक्ष कैलास माळी, पनवेलचे उपतालुकाध्यक्ष विश्वास पाटील, पनवेल तालुका सचिव दिनेश मांडवकर, विभाग अध्यक्ष विद्याधर चोरगे, नितीन जीवने, साद पटेल, साद नागे, अक्षय पाटील यांसह इतरही मनसे कार्यकर्ते यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

या वेळी पनवेल शिवसेनेचे संपर्कप्रमुख राजेंद्र यादव, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, उरण उपजिल्हाप्रमुख विनोद साबळे, महानगर संघटक मंगेश रानावडे, उपमहानगरप्रमुख सचिन मोरे, महेश सावंत, तळोजे शहर प्रमुख विशाल पवार, विभाग प्रमुख राकेश गोंधळी, प्रकाश म्हात्र , उपतालुकाप्रमुख सतीश पाटील, कळंबोली महिला शहरप्रमुख ज्योती पाटील, अरफात पटेल व इतर शिवसेनेचे पदाधिकारीही उपस्थित होते.

# पनवेलमध्ये उन्हाळी शिबिर उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या दोन वर्षापासून द आर्टसी क्राफ्टसी समर कॅम्प (उन्हाळी शिबिर) व्यवस्थापक स्वप्ना साखरे आणि संस्थापक सोनल थोरात यांच्या द आर्टसीक्राफ्टसी संस्थेकडून तीन वर्षांवरील मुलांसाठी समर कॅम्प रचना हाईट, पनवेल येथे ७ ते १७ मे २०२५ रोजी भरविण्यात आला.

या कॅम्प मध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेत आपल्या कला गुणांचे उत्तम सादरीकरण केले तसेच मुलांची बौद्धिक क्षमता वाढविण्यासाठी मेंदूचे व्यायाम घेण्यात आले. शिबिरात गोष्टी सांगणे, खेळ, वारली आर्ट, ओएचपी शीटवर रांगोळी, व्यायाम, डान्स, चित्रकला, आगीचा वापर न करता फूड बनवणे, पेपर प्लेटवर एक्वेरियम बनविणे अशाप्रकारचे विषय शिकवण्यात आले.

मुलांना प्रमाणपत्र आणि आकर्षक भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले. या वेळी भाजप ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा प्रभारी प्रसाद हनुमंते उपस्थित होते.



# 'नाटके सादर करण्यात सातत्य ठेवणारे कुंडेगाव'

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील काही गावांना दर वर्षी एक किंवा तीनचार नाटकेही सादर होत असत परंतु त्यानंतर या सादरीकरणात खंड पडत गेला, काही गावात नाटकांचे सादरीकरण थांबले आहे, मात्र मागील सत्तर वर्षां पैकी ५/६ वर्षे सोडल्यास कुंडेगाव हे गाव सातत्याने नाटक सादर करणारे गाव आहे, असा विचार ज्येष्ठ साहित्यिक रायगड भूषण प्रा.एल. बी.पाटील यांनी उरण कुंडेगाव येथे नाटकाच्या उद्घाटनावेळी मांडले.



नाटकाचे उद्घाटन सुनंदा लक्ष्मण पाटील यांच्या हस्ते झाले.ग्रा.पं.सदस्या रंजना भोईर, कुंडेगाव अध्यक्ष अजय कुंडेगावकर, लोककलाकार दत्ता भोईर, प्रमोद ठाकूर, नाटककार किशोर पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, अनिल भोईर, प्रमोद पाटील, नितीन मढवी, नासिकेत म्हात्रे, कृष्णा गोवठणेकर, चंद्रविलास घरत इत्यादी तालुक्यातील प्रतिष्ठित आणि कलाकारांची या वेळी आवर्जून उपस्थिती होती.

या नाटकाचे लेखन भरत पाटील, दिग्दर्शन राजेंद्र चोगले, राजेश पाटील, रंगभूषा अमृत म्हात्रे, प्रकाश योजना, संगीत मोहन भोईर, दिलीप पाटील, ध्वनी धृव म्हात्रे इत्यादींनी नाटक यशस्वी करण्यासाठी आपली कामगिरी चोख बजावली.

कलाकार भरत पाटील, राजेश पाटील, राजेंद्र चोगले, सुदर्शन भोईर, जयवंत पाटील, राजेंद्र पाटील, शौर्य पाटील, रुपये मढवी, अन्विता पाटील, प्रज्ञा म्हात्रे, वैशाली मोहिते या सर्व कसलेल्या कलाकारांनी साजेशी अभिनय सादर करून रसिक प्रेषकांची मने जिंकली आहेत. गाव कलाकारांचे सुंदर नाटक परिसरातील प्रेक्षकांना या वेळी पहावयास मिळाले.

# कळंबोलीत अवकाळी पावसाची हजेरी

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीत मंगळवारी सायंकाळी सात वाजता सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांचा कडकडाट करून अवकाळी पावसाने धुवाधार बरसात केल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले होते.

तब्बल अर्धा ते पाऊण तास वरून राजा धुवाधार बरसात होता अचानक पणे पावसाने हजेरी लावल्याने वातावरणातही चांगला गारवाही निर्माण झाल्याने कळंबोली कर काही काळ सुखावले ही अनं दुखावले ही. मे महिन्यातील उन्हाच्या काहीलिने घामाघुन झालेल्या कळंबोलीकरांना अचानकपणे बरसलेल्या पावसाच्या मुळे थंडगार गारव्याचा धक्काही दिला. कळंबोलीत विविध ठिकाणी सुरू असलेल्या रस्त्याच्या सिमेंट काँक्रीरिटीकरणाच्या खोदकामाने धुवाधार पावसाने अनेक ठिकाणी पाणीही साचले त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाल्यासारखे होते.

मंगळवारी सायंकाळी पाच वाजल्यापासून कळंबोली सह पनवेलमध्ये गडद ढगांनी थोडीफार गर्दी केल्याने वातावरण पूर्णपणे अंधारमय सारखे वाटत होते. यातच सात वाजण्याच्या सुमारास अचानक पणे विजांचा कडकडाट सह सोसाट्याच्या वाऱ्या बरोबरच वरुणराजाने अवकाळी बरसून नागरिकांची चांगलीच त्रेधातिरपीट उडवून टाकली. मुसळधार पावसाने बरसात केल्याने कळंबोली सह पनवेलमधील जनजीवनही विस्कळीत झाले होते.अवकाळी पावसाबरोबरच सोसाट्याचा वारा असल्याने काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

विजांच्या लखलखाट व कडकडाटासह अवकाळी पावसाची बरसात धुवाधार झाल्यानंतर वातावरण पूर्णपणे बदलून गेले. धूवादार बरसणाऱ्या पावसामुळे कामावरून परतणाऱ्या कामगारांची चांगलीच त्रेधा तिरपीट उडाली. कळंबोलीमध्ये ठिकठिकाणी खोदून ठेवलेले रस्ते खोदून ठेवलेले नाले आणि त्यातच साठलेल्या पाण्याने जनजीवन पूर्णतः विष्कळीत झालेले दिसले. सायंकाळी अर्धा ते पाऊण तास पावसाने चांगलीच बरसात केल्याने हवेत चांगलाच गारवा आल्याने कळंबोली करू चांगले सुखावले.

# सिमेंट मिक्सरची स्कूटरला धडक

## एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

सिमेंट मिक्सरने स्कूटरला दिलेल्या धडकेत संगीता धनाजी कडू या महिलेचा मृत्यू झाला. तिचे पती धनाजी कडू हे जखमी झाल्याची घटना कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.

या अपघाताप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात सिमेंट मिक्सर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सुकापूर येथे राहणारे धनाजी हे त्यांची पत्नी संगीता हिच्यासोबत त्यांच्या टीव्हीएस स्कूटरने नातेवाईकाच्या साखरपुड्याला छाया रिसॉर्ट, मानघर येथे गेले होते. मानघर येथून रात्रीच्या वेळेस घरी परत येत असताना उरण रोडवर सिमेंट मिक्सर चालकाने कडू यांच्या स्कूटरला धडक दिल्याने हा अपघात झाला.

# गोवठणेतील नहूष म्हात्रेचे सुयश

**उरण : बातमीदार**

स्वप्न जर गगनभेदि असतील आणि प्रयत्नांची पराकाष्टा त्या दिशेने होत असेल तर यश हे खूप जवळ असते. एसएससी बोर्ड परीक्षेत सुविद्या विद्यालय कामोठे येथे शिक्षण घेणाऱ्या नहुष मेघनाथ म्हात्रे याने एसएससी परीक्षेमध्ये ९१.४० टक्के मिळवून शाळेत तिसरा नंबर पटकावून उरण तालुक्यातील गोवठणे गावाचे नाव रोशन केले आहे.



ग्रामीण भागातील विद्यार्थी हे अतिशय कुशाग्र बुध्दीचे असतात हे नहूष ने सर्वांना दाखवून दिले आहे. या घवघवीत यशाबद्दल नहूष चे सर्वच स्तरावर कौतुक केले जात आहे. गोवठने गावाच्या समस्त नागरीकांनीही नहुषचे कौतुक केले आहे. गोवठणे गावामध्ये प्रसिद्ध यु ट्यूब कलाकार प्रेमनाथ म्हात्रे, श्रीराम म्हात्रे, प्रदीप म्हात्रे, यश म्हात्रे, रचित म्हात्रे, श्रेया म्हात्रे यांनी नहुष म्हात्रे यांचे सत्कार करून त्याचे भरभरभरून कौतुक केले आहे.

# हनुमान कोळीवाडा येथे रक्तदान शिबिर

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

संत निरंकारी चारिटेबल ट्रस्ट यांच्या माध्यमातून आणि संत निरंकारी रक्तपेढी विलेपार्ले यांच्या व्यवस्थापना अंतर्गत सकाळी ९ ते १ या वेळेत सेक्टर १९ या विभागात संत निरंकारी सत्संग भवन उरण हनुमान कोळीवाड़ा या ठिकाणी भव्य रक्तदान शिबिर आयोजन करण्यात आले होते. संयोजक दत्ता पाटील, मेडिकल प्रमुख मारुती कासारे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

मुखी अनंत शेणाय, मुखी समिर पाटील, मुखी रोशन घरत यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. सोबतच सेक्टर मधील सेवादल अधिकारी यांची ही उपस्थिती मोठया प्रमाणात होती.१५० रक्तदात्यांनी यात सहभाग घेतला होता. तर सुमारे ६० युनिट रक्तपेढीत रक्त जमा झाले. रक्तदाता आणि डॉक्टर स्टाफ, मेडिकल कर्मचारी आणि निरंकारी सेवादल यांचा उत्साह सेवेतून जाणवत होता. युनिट नं. ५८३ हनुमान कोळीवाड़ा यांनी सर्व व्यवस्था सुयोग्य रित्या पार पाडली. सर्वांच्या मौल्यवान सहकार्याने शिबीर यशस्वी रित्या झाले.



# ऑरायन मॉलमध्ये विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

कुडाळदेशकर आद्यगौडब्राम्हण पनवेल व ओरायन मॉल पनवेल यांच्या संयुक्तविद्यमाने सामाजिक उपक्रमांतर्गत, नेहरू सायन्स सेंटर, मुंबई यांच्या सहयोगाने ओरायन मॉल पनवेल येथे विद्यार्थ्यांसाठी ऐक अद्भुत प्रयोगशाळा विज्ञान प्रदर्शन आयोजित केली आहे.

हे प्रदर्शन व त्यातील मुलांसाठीचे वर्कशॉपचे शुल्क रुपए ३०० एवढे आहे, परंतु तळागाळातील शाळेतील विद्यार्थ्यांना ही प्रदर्शन बघता यावे यासाठी कुडाळदेशकर आद्य गौड़ ब्राह्मण संस्था पनवेल व ओरायन मॉल यांच्या सामाजिक उपक्रमांतर्गत, बालग्राम अनाथ आश्रम पनवेल आणि जिल्हा परीषद शाळा, कराळेवाडी, जिल्हा कर्जत येथील विद्यार्थ्यांसाठी हे प्रदर्शन विनामुल्य दाखवायचे ठरवले होते.



नेहरू सायन्स सेंटर येथुन आलेल्या स्वयंसेवकांनी प्रदर्शनातील प्रत्येक प्रयोग व त्या मागचे सायन्स मुलांना समजाऊन सांगीतले. वस्तुच्या चढऊतारा चे प्रयोग, बिंदु डोळ्या समोरुन नाहीसा होणे, दृष्टि भ्रम अशा अनेक प्रयोगाचे प्रात्यक्षीक दाखऊन नंतर सर्व मुलांना सगळे प्रयोग स्वतः अनुभवण्यास सांगीतले. नंतर सर्व मुलांचे सायन्स वर्कशॉप घेतले. प्रत्येकाला काही वस्तू देऊन प्रयोग करायला सांगीतले व पुस्तकातले सायन्स कसे प्रयोगातून अनुभवायला मिळते याची माहिती दिली. या नंतर सर्व विद्यार्थ्यांना ऑरायन मॉलच्या फुड कोर्ट मध्ये अल्पोपहारासाठी बर्गर दिल्यावर मुलांच्या चेहर्यावर आनंद पसरला. अनेक मुला मुलींनी आजचा दिवस आमच्या साठी खास होता सायन्स प्रदर्शनाने खुप माहिती मिळाली असे सांगीतले.

ऑरायन मॉलचे मालक व कुडाळदेशकर आद्य गौड़ ब्राह्मणचे अध्यक्ष मंगेश परुळेकर यांनी सांगितले की, समाजाच्या तळागाळातील मुलांची या सायन्स प्रदर्शना मुळे शिकण्याची गोडी वाढावी, त्यांना प्रेरणा मिळावी हा ऊद्देश या मागे आहे.

सामाजिक उपक्रमासाठी कुडाळदेशकर आद्य गौड़ ब्राह्मण पनवेल संस्थे तर्फे शाम वालावलकर, अक्षय वालावलकर निशा वालावलकर, भाऊ सामंत, यतीन ठाकूर यांची उपस्थिती लाभली.

## संपादकीय

# युद्धाच्या नव्या पद्धती?

पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या संशयावरून अटक करण्यात आलेली हरियाणास्थित युट्यूबर ज्योती मल्होत्रा हिने आयएसआय एजंटांच्या नियमित संपर्कात असल्याची कबुली दिल्याचे सांगितले जात असून तिने अलीकडच्या काळात अनेकदा बिहारलाही भेट दिल्याने सरकारी यंत्रणांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

**गेल्या दोन आठवड्यांत देशात किमान बारा जणांना पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपांवरून अटक झाली आहे. सध्या चर्चेत असलेली युट्यूबर ज्योती मल्होत्रा ही यांच्यापैकीच एक असून यातील सहा जण पंजाबचे, चार जण हरियाणाचे आणि दोघे उत्तर प्रदेशातील आहेत. आधुनिक युद्ध निव्वळ संबंधित दोन देशांच्या सीमेवरच लढले जात नाही तर त्यात काही नवीन पद्धतींचाही अंतर्भाव असल्याची माहिती देशातील पोलिसांना मिळाली आहे. पाकिस्तानी इंटेलिजन्स ऑपरेटिव्ह्ज अर्थात पीआयओ काही सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सची म्हणजेच भारतातील समाजमाध्यमांवर लोकप्रिय असणाऱ्यांची भरती करण्याच्या प्रयत्नात आहेत. या मंडळींचा वापर आपली भूमिका किंवा नरेटिव्ह पुढे नेण्यासाठी करण्याच्या हेतूने ही पावले उचलली जात असावीत. केंद्रीय यंत्रणांकडून स्थानिक पोलिसांना ही माहिती मिळाल्यानंतरच ज्योती मल्होत्राला अटक करण्यात आली. ज्योती पीआयओच्या संपर्कात होती, तसेच ती अनेकवेळा पाकिस्तानात गेलीही आहे. एकदा चीनलाही ती जाऊन आली आहे. भारतीयांसाठी पाकिस्तान किंवा चीनच्या भेटी इतक्या सोप्या नसताना तिला हे कसे शक्य झाले असावे? १६ मे रोजी तिला अटक करण्यात आली. पकडलेले इतर सर्व जणही पाकिस्तानसंबंधित हेरगिरी जाळ्याचा भाग असून त्या सर्वांनी राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवल्याचा संशय आहे. ज्योती मल्होत्रा हिच्यासह दोन महिला नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयात तैनात अधिकारी एहसान-उर-रहीम उर्फ दानिश याच्या संपर्कात होत्या असा आरोप आहे. या पाकिस्तानी अधिकाऱ्याची भारताने अलीकडेच हेरगिरीच्या आरोपावरून हकालपट्टी केली आहे. अटक करण्यात आलेल्या सर्वांचे आर्थिक व्यवहार आणि त्यांच्या मोबाइल, लॅपटॉप आदींची फोरेन्सिक तपासणी सुरू आहे. यांच्यापैकी ज्योतीचे पाकिस्तानविषयीचे प्रेम तिच्या व्हिडिओ ब्लॉगमधून दिसतेच. तिच्यावर हेरगिरी केल्याचा आणि तिच्या कंटेंटद्वारे पाकिस्तानची सकारात्मक प्रतिमा तयार करण्यासाठी तिथल्या हस्तकांच्या थेट संपर्कात राहण्याचा आरोप आहे. आधी गुरुग्राममधील एका कंपनीत नोकरी करणाऱ्या ज्योतीने कोरोना काळात नोकरी सोडली व जवळपास तीन वर्षांपूर्वी ती ट्रॅव्हल ब्लॉगर झाली. 'ट्रॅव्हल विथ जो' असे ज्योती मल्होत्राच्या युट्यूब चॅनल आणि इन्स्टाग्राम पेजचे नाव आहे. तिच्या युट्यूब चॅनलचे जवळपास चार लाख सबस्क्राइबर्स आहेत. इन्स्टाग्रामवर तिचे १.४० लाख फॉलोअर्स आहेत. तर फेसबुकवर ३.२२ लाख फॉलोअर्स आहेत. तिच्या चॅनलवर देश-विदेशातील प्रवासाचे ४०० हून अधिक व्हिडिओ टाकण्यात आले आहेत. चॅनलवरील सर्वात ताजा व्हिडिओ इंडोनेशियातील तिच्या प्रवासाचा आहे. दोन वर्षांपूर्वी तिचा पाकिस्तान उच्चायुक्तालयातील अधिकारी दानिश याच्याशी संपर्क आला. त्यानंतर ती तीन वेळा पाकिस्तानला गेली. तिथे दानिश याच्या परिचयातील व्यक्तीनेच तिची सारी व्यवस्था केली. गेल्या वर्षी भारतात झालेल्या पाकिस्तानी उच्चायुक्तालयाच्या डिनर पार्टीचा ज्योतीचा व्हिडिओही चर्चेत असल्याचे सांगितले जाते. या पार्टीत ती विशेष आमंत्रित होती. मार्च आणि एप्रिल महिन्यातही ज्योती पाकिस्तानात गेली होती. याचे अनेक व्हिडिओ व रील तिच्या चॅनलवर आहेत. ज्योतीच्या वडिलांनी तिच्यावरील आरोप फेटाळले होते. परंतु तिच्या कबुलीजबाबातून मात्र त्यांना दुजोरा मिळताना दिसतो आहे.**

# डेरवणला वैद्यकीय शिक्षण आणि उपचाराची संधी



रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यामध्ये भ.क.ल. वालावलकर रुग्णालय व मेडिकल कॉलेजमध्ये ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय श्रीक्षेत्र डेरवण येथे निसर्ग सानिध्यात आध्यात्मिक पार्श्वभूमी असलेल्या वैद्यकीय क्षेत्रातील सेवाभावी लोकांचा एक मोठा समुदाय वैद्यकीय उपचार आणि विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण देण्यासाठी सेवाभावी वृत्तीने सक्रिय आहे.

या रुग्णालयामध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत कॅन्सल सर्जरी, केमोथेरपी, अद्ययावत रेडिएशन थेरपी, पेट स्कॅन, अँजीओग्राफी, अँजिओप्लास्टि, बायपास, पेस मेकर, दुर्बीनेद्वारे सरकलेल्या चकती वरील शस्त्रक्रिया, सांध्यावरील शस्त्रक्रिया, गुढघे आणि खुबा बदलण्यासाठी शस्त्रक्रिया, मेंदूतील रक्तस्त्राव, मेंदूतील गाठी, ब्रेन ट्युमर, मेंदूतील रक्तस्त्राव, मणक्यातील ट्युमर वरील शस्त्रक्रिया, मुतखडे, प्रोटेस्ट ग्रंथी, डायलिसिस सुविधा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, नाकाचे हाड वाढणे, सायनस शस्त्रक्रिया, कानाच्या हाडाची शस्त्रक्रिया, कानाच्या पडद्याची शस्त्रक्रिया, अश्रू पिशवीची शस्त्रक्रिया, टॉन्सिल, नॉर्मल व सिझेरियन डिलिव्हरी अशा विविध प्रकारच्या आजार, व्याधी तसेच रोगांवरील वैद्यकीय उपचारांसाठी व शस्त्रक्रियांसाठी मोफत सुविधा उपलब्ध आहेत. या खेरीज अरुण कुरकुरे योजनेअंतर्गत या रुग्णांना कॅन्सल सदृश्य लक्षणे व गाठी आहेत अशा गुणांना २५ हजार रुपयांपर्यंत मोफत निदानाच्या चाचण्या करता येतात.

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने डेरवण येथे रुग्णालयाबरोबरच अनेक शैक्षणिक उपक्रमही चालविले आहेत. इंग्रजी माध्यमाची बारावीपर्यंत शिक्षण देणारी सीबीएसई मान्यताप्राप्त शाळा, वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग कॉलेज आणि अल्प मुदतीचे विविध वैद्यकीय कौशल्ये शिकविणारे अभ्यासक्रम असणारे कॉलेज ऑफ एडव्हान्स्ड स्टडीज याद्वारे विद्यार्थ्यांना अनेक व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्याची सुवर्णसंधी डेरवण येथे उपलब्ध आहे. सदर अभ्यासक्रमासाठी प्रवेश शासन-नियम व गुणवत्तेनुसारच दिले जातात. संस्थेमध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र वसतिगृह व मेसची सोय आहे. सर्व विद्यार्थ्यांना तज्ज्ञ अध्यापकांकडून वैयक्तिक मार्गदर्शन दिले जाते. या व्यतिरिक्त संस्थेमध्ये स्वयंस्फूर्तीने काम करणाऱ्या अनेक सेवाभावी मातब्बर तज्ज्ञांचे मार्गदर्शनही लाभते. संस्थेच्या विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाच्या जोरावर अनेक सामाजिक व वैद्यकीय संशोधन प्रकल्प यशस्वीपणे

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पूर्ण केले आहेत बा पूर्वीच्या बॅचेसचा निकाल सर्वसाधारणपणे शत-प्रतिशत आहे व अनेक विद्याथों प्रथमश्रणात उत्तीर्ण झालेले आहेत. उत्तीर्ण झालेले बहुतेक सर्व विद्यार्थी अनेक शासकीय व नामवंत खाजगी संस्थांमध्ये चांगल्या पदांवर काम करत आहेत. येथील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी व जगाच्या नव्या संधी मिळवून देण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरत आहेत. या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना भारतात व परदेशात भरपूर मागणी आहे.

स्वयंरोजरासाठीही हे अभ्यासक्रम उपयुक्त आहेत. संस्थेच्या रुग्णालयामध्ये व इतर कल्पांमध्ये गरजेनुसार विद्यार्थ्यांना सेवेत सामावून घेतले जाते. संस्थेचे अनेक विद्यार्थी या आसपासच्या सार्वजनिक आरोग्य केंद्रांमध्ये, शासकीय रुग्णालयांमध्ये, शासनाच्या अनेक आरोग्यप्रकल्पांमध्ये कार्यरत आहेत. काही विद्यार्थ्यांना केंद्रशासनाच्या रेल्वे व संरक्षण यासारख्या विभागांमध्ये देखील काम करण्याची संधी मिळाली आहे. हिंदुजा, नानावटी, फोर्टीस, कोकिलाबेन, लीलावती व दीनानाथ मंगेशकर या सारख्या नामांकित रुग्णालयांमध्ये संस्थेचे अनेक विद्यार्थी कार्यरत आहेत.

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटी ट्रस्ट फक्त श्रेष्ठ कमलाकर लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संलग्नित अभ्यासक्रम शिकवले जातात. बारावी विज्ञान आणि नीट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी एमबीबीएस आज साडेचार वर्षाचा अभ्यासक्रम आणि एक वर्ष इंटर्नशिप बीपीटीएच फिजिओथेरपी हा चार वर्षांचा अभ्यासक्रम आणि सहा महिने इंटर्नशिप आणि बीएससी नर्सिंग हे अभ्यासक्रम शिकवले जात आहेत. या खेळीत बीएससी पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी, फॉरेन्सिक मेडिकल सायन्स टेक्निशियन, बीएससी पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी इंडॉस्कॉपी, बीएससी पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी कम्युनिटी मेडिसिन टेक्निशियन, बीएससी पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिस टेक्निशियन हे तीन वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम असून एक वर्ष इंटरशिप करावी लागते.

सर्टिफिकेट कोर्स इन रेडिओग्राफी टेक्निशियन, सर्टिफिकेट कोर्स इन इसीजी टेक्निशियन, सर्टिफिकेट कोर्स रेस्पायरेटरी थेरेपिस्ट, सर्टिफिकेट कोर्स इन अनेस्थेशिया टेक्निशियन हे एक वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रम शिकवले जात आहेत. सर्टिफिकेट कोर्स इन क्रिटिकल केअर डायलिसिस आणि सर्टिफिकेट कोर्स इन ऑपरेशन थिएटर टेक्नॉलॉजी हे दोन अभ्यासक्रम प्रस्तावित आहेत.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांच्याशी संलग्न तंत्र शिक्षण अभ्यासक्रम देखील येथे शिकवले जातात. यामध्ये डव्हान्सड डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी हा एक वर्षाचा अभ्यासक्रम बीएससी, बीएएमएस, बीएचएमएस, बीव्हीएससी, बीपीटीएच, एलसीएचसी, डीएचएमएस व तत्सम शैक्षणिक पात्रता धारकांसाठी आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ इंडियन व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल आणि एम एस बी एन पी इ संलग्न अभ्यासक्रम ए एन एम (एक्झिलरी नर्सिंग अँड मिडवायफरी) कोणत्याही शाखेच्या बारावी उत्तीर्ण २० विद्यार्थ्यांसाठी दोन वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम, जी एन एम( जनरल नर्सिंग अँड मिडवायफरी) बारावी विज्ञान शाखेच्या ६० विद्यार्थ्यांसाठी तीन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम, पीबी बीएससी नर्सिंग हा जी एन एम अथवा ए एन एम अभ्यासक्रम किमान ५० टक्के ने उत्तीर्ण झालेल्या २० विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम आहे. एम एस सी नर्सिंग हा पी बी बी एस सी अथवा बीएससी नर्सिंग अभ्यासक्रम उत्तीर्ण होऊन एक वर्ष अनुभव असलेल्या २३ विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम आहे.

मुंबई विद्यापीठाच्या गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ कबीर एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट च्या सहयोगाने समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्यूट मध्ये बीएससी इन बायो मेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन हा बारावी विज्ञान उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी तीन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम आहे. बीएससी इन सायकॉलॉजिकल हेल्थ अँड बिहॅवियरल सायन्स हा बारावी विज्ञान उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी तीन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम आहे. एम एस सी एन बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन हा बीएससी इन बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम आहे. एम एस सी इन क्लीनिकल सायकॉलॉजी बीएससी सायकॉलॉजी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम आहे.

या खेरीज, श्री विठ्ठलराव जोशी चैरिटी ट्रस्ट व वात्सल्य ट्रस्ट मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने टेलरिंग अँड फॅशन डिझायनिंग, ब्युटी पार्लर, संगणक प्रशिक्षण आणि जनरल ड्युटी सहाय्यक हे किमान दहावी उत्तीर्ण विद्यार्थिनींसाठी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. भ.क.ल. वालावलकर रुग्णालय, ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, फिजिएथेरपी कॉलेज, न्यूक्लिअर लॅब, हॉस्टेल, लायब्ररी अँड रीडिंग हॉल, मेस हॉल, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स अशा अनेक विविध इमारती असलेल्या डेरवण परिसरामध्ये शिवसमर्थ गड व महाराष्ट्रातील पहिली शिवसृष्टी, डेरवण मठ, राजावाडी धरण, परिसरातील पाणीटंचाईग्रस्त गावांसाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा योजना या खेरीज विविध शासकीय वैद्यकीय सुविधा व सवलती योजनांच्या व्यतिरिक्त अतिशय गरीब तसेच क्लिष्ट आजार तसेच जखमींसाठी उद्योगपती वालावलकर यांच्या माध्यमातून अधिकच्या सवलती देखील देण्यात आलेल्या आहेत.



## बदलते तंत्रज्ञान

### भारताची बायोमेट्रिक ई-पासपोर्ट सेवा सुरू


भारत सरकारने तंत्रज्ञान क्षेत्रात आतापर्यंत अनेक बदल केले आहेत. त्यातच आता एक नवीन निर्णय घेत ई-पासपोर्टची सेवा सुरु करण्यात आली आहे. भारत सरकारने अधिक सुरक्षित आणि जलद ओळख प्रक्रियेसाठी मायक्रोचिप-सक्षम ई-पासपोर्ट सेवा सुरू केली आहे. भारत सरकारने ही सेवा सुरू करून तंत्रज्ञानाचं एक नवीन युग सुरू केला आहे.भारताबाहेर प्रवास करण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पासपोर्ट आहे. पासपोर्टशिवाय तुम्ही कोणत्याही देशात जाऊ शकत नाही. पासपोर्ट तयार करण्यासाठी फॉलो करावी लागणारी प्रोसेस थोडी किचकट आहे, त्यामुळे बरेचं लोकं असे आहेत की जे ही प्रोसेस फॉलो करावी लागू नये म्हणून पासपोर्ट बनवतच नाही. पण आता तुम्हाला ही किचकट प्रोसेस फॉलो करण्याची गरज नाही. भारतात ई पासपोर्ट सर्विस सुरु करण्यात आली आहे. पासपोर्ट प्रणाली अधिक सुरक्षित आणि स्मार्ट बनवण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. ई पासपोर्ट सर्विसचे अनेक फायदे आहेत. ई- पासपोर्टमुळे प्रवाशांची ओळख सुरक्षित राहणार आहे. याशिवाय इंटरनॅशनल प्रवासात देखील मदत मिळणार आहे.



यामध्ये एक खास माइक्रोचिप लावलेली असते. या चिपमध्ये तुमची वैयक्तिक माहिती, तसेच बायोमेट्रिक डिटेल्स देखील सेव्ह केलेल्या असतात. जसं की फोटो, फिंगरप्रिंट इत्यादी. हा संपूर्ण डेटा सुरक्षित पद्धतीने एन्क्रिप्टेड असतो. हा डेटा केवळ अधिकृत स्कॅनिंग सिस्टमद्वारेच वाचला जाऊ शकतो. ई-पासपोर्टद्वारे परदेशात प्रवास करणारे भारतीय नागरिक आता इमिग्रेशन चेकपॉइंट्सवर जलद, स्वयंचलित आणि संपर्करहित प्रक्रियेतून जाऊ शकतील. ई-गेट्समुळे लांब रांगांची गरज कमी होईल आणि प्रवासाचा अनुभव अधिक सुरळीत होईल.

पासपोर्ट प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल आणि पेपरलेस होण्यास यामुळे मदत होणार आहे. शिवाय, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात देशाची जागतिक ओळखही मजबूत होईल यात शंका नाही. भारताच्या काही निवडक शहरांमध्ये सध्या ई-पासपोर्ट सेवा सुरु करण्यात आली आहे. या शहरांमध्ये नागपुर, चेन्नई, जयपुर, दिल्ली, हैदराबाद, रांची, शिमला, भुवनेश्वर, गोवा आणि जम्मू इत्यादींचा समावेश आहे.

# समाजसुधारक राजाराम मोहन रॉय



## निमित्त

आधुनिक भारतातील अग्रगण्य धर्मसुधारक व ब्राह्मो समाजाचे संस्थापक म्हणजे राजाराम मोहन रॉय. त्यांचा जन्म पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील राधानगरी या गावी २२ मे १७७२ रोजी झाला. कृष्णचंद्र बंदोपाध्याय हे त्यांचे प्रतितामह बंगालमधील नवाबाच्या नोकरीत होते. नवाबाच्या दरबाराने 'राय' ही सन्मानदर्शक पदवी त्यांना दिली. त्यांचे पितामह ब्रजविनोद रॉय यांनी नवाबाची नोकरी सोडून दिली. रामकांत रॉय यांच्या कुळात वैष्णव संप्रदात होते. राममोहनांची माता तारिणीदेवी यांचे माहेर राममोहन रॉय याचे पिता आणि पितामह हे परमधार्मिक होते.

राममोहन यांचे बंगाली, फार्सी व संस्कृत या तीन भाषांचे प्राथमिक अध्ययन घरीच झाले. वयाच्या अठराव्या वर्षी ते बिहारमधील पाटणा येथे अरबी आणि फार्सी यांच्या शिक्षणासाठी गेले. कुराणाचाही त्यांनी अभ्यास केला. मुल्ला व मौलवी त्यांचा अरबी, फार्सी पांडित्याने विस्मित होत. इस्लाम धर्मातील आणि सूफी संप्रदायातील त्यांची पारंगतता पाहून माता-पित्यांनी संस्कृत अध्ययनासाठी त्यांची वाराणसीला रवाना केले. श्रुती स्मृती-पुराणांचा, कुराणाचा आणि बायबलचा सखोल अभ्यास त्यांनी केला. वयाच्या सोळाव्या वर्षी ते आपल्या गावी परतले.

राममोहन यांनी आपले मूर्तिपूजाविरोधी विचार आपल्या पित्याला व मातेला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र माता-पिता आणि राममोहन यांच्यामध्ये जबरदस्त मतभेद उत्पन्न झाला. त्यांची माता-पित्यावर श्रद्धा होती आणि विलक्षण भक्तीही होती. मतभेदामुळे राममोहन यांना घर सोडावे लागले. त्यांनी भारतभर प्रवास केला. बौद्ध धर्माचा व तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासाठी ते तिबेटमध्ये गेले.

तत्कालीन रीतीला अनुसरुन राममोहनांचे बालपणीच पहिले लग्न झाले होते. प्रथम पत्नीच लवकरच निवर्तल्यामुळे वडिलांनी १७८१ व १७८२ साली त्यांची दोन लग्ने लावून दिली. १८०० साली त्यांना पुत्रप्राप्ती झाली. पुत्राचे नाव राधाप्रसाद असे ठेवले. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढल्याने घरची सांपत्तिक स्थिती ठीक असूनही त्यांना सरकारी नोकरी पत्कारावी लागली. १८०३मध्ये डाक्का येथील कलेक्टर टॉमस वुडफर्ड याचे दिवाणपद स्वीकारले. त्याच वेळी रामकांत रॉय निवर्तले. याच सुमारास राममोहनांनी ग्रंथलेखनास सुरुवात केली. फार्सी भाषेत त्यांनी 'ईश्वरभक्तांस देणगी' या अर्थाच्या शीर्षकाखाली एक निबंध प्रसिद्ध केला. त्याचे सार असे-सृष्टिकर्ता व पालनकर्ता एक निराकार परमेश्वर आहे. हा सिद्धांत सर्व धर्माचा पाया होय. निरनिराळ्या धर्माच्या लोकांनी या धर्मतत्त्वावर भलभलत्या कल्पनांचा डोलारा चढवला. त्यामुळे भिन्नभिन्न धर्मसंप्रदाय अस्तित्वात आले.

१८१८ साली सतीची प्रथा बंद व्हावी म्हणून समाजातील प्रतिष्ठित मंडळीच्या सह्यांसह एक अर्ज त्यांनी सरकारकडे पाठवला. ४ डिसेंबर १८२९ रोजी सतीबंदीचा कायदा जाहीर झाला. आपल्या धर्मविषयक व ईश्वरविषयक उदार तत्त्वज्ञानाचा व उपासनापद्धतीचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी २० ऑगस्ट १८२८ रोजी ब्राह्म समाजाची स्थापना केली. त्या वेळी दिल्लीच्या बादशहाने खुष होऊन त्यांना 'राजा' हा किताब दिला. २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टल येथे त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### ओठांच्या कोरडेपणाची कारणं आणि सोपे उपाय

आपले ओठ सौंदर्याचं आणि आत्मविश्वासाचं एक प्रतीक असते. पण ओठांची त्वचा खूप नाजूक असते आणि त्यामध्ये तेल ग्रंथी (ऑइल ग्लँड्स) नसल्याने ती लवकर कोरडी पडते. यामुळे अनेकजण सतत लिप बाम वापरूनही आराम मिळत नाही अशी तक्रार करतात. पण यामागे काही खास कारणं असू शकतात. चला तर जाणून घेऊया ओठ कोरडे पडण्याची प्रमुख कारणं आणि त्यावर उपाय आहे.



१. फ्रेग्रन्स आणि मेन्थॉलयुक्त लिप बाम
काही लिप बाम चांगल्या ब्रँडचे असले तरी त्यातील कृत्रिम वास किंवा मेन्थॉल ओठांची त्वचा अजून अधिक कोरडी करू शकतात. जर तुम्ही नियमित लिप बाम वापरता आणि तरीही तुमचे ओठ बरे होत नसतील, तर त्यामागे हेच कारण असण्याची शक्यता आहे.

२. एसपीएफ नसलेली लिप केअर प्रॉडक्ट्सउन्हामध्ये चालताना तुमच्या ओठांचं संरक्षण देखील तितकंच महत्त्वाचं आहे. SPF नसलेले लिप बाम किंवा लिपस्टिकमुळे सूर्यकिरणांचा परिणाम होऊन ओठ कोरडे, काळे आणि रुखरुखीत होतात. किमान SPF १५ असलेले लिप प्रॉडक्ट निवडणे आवश्यक आहे.

३. डिहायड्रेशन - शरीरात पाण्याची कमतरताशरीरात पाण्याची कमतरता झाल्यास त्याचा परिणाम सर्वप्रथम ओठांवर दिसतो. ओठांना नैसर्गिक तेल नसल्याने ते पटकन कोरडे पडतात. त्यामुळे दररोज किमान ८-१० ग्लास पाणी पिणे गरजेचे आहे.

४. ग्लिटरयुक्त लिपस्टिक आकर्षक दिसत असली तरी ती ओठांच्या नाजूक त्वचेला नुकसान पोहोचवू शकते. जर तुम्हाला अशा लिपस्टिकचा वापर करायचा असेल तर आधी एक थर लिप बाम किंवा पेट्रोलियम जेली लावणे फायदेशीर ठरेल.

५. एक्सफोलिएशनचा अभावडेड स्किन जमा झाल्याने लिप बाम ओठांमध्ये नीट शोषित होत नाही. आठवड्यातून एकदा सौम्य साखरेचा स्क्रब, मृदू टूथब्रश किंवा हलका एक्सफोलिएंट वापरून ओठ स्वच्छ केल्यास त्यांची मऊतास आणि ओलसरता टिकून राहते.

६. मॅट लिपस्टिकमध्ये ग्लॉसी लिपस्टिकच्या तुलनेत अधिक व्हॅक्स असते, त्यामुळे ती त्वचेला ड्राय करते. विशेषतः हिवाळ्यात याचा परिणाम जास्त होतो.

# रोह्यात तरुणीचे अपहरण करण्याचा आरोपीचा डाव फसला

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील चणेरा येथील महाविद्यालयीन तरुणीला तुला घरी सोडतो सांगुन पळवुन नेण्याचा प्रयत्न तिच्या प्रसंगावधानामुळे फसला असुन आरोपीला रोहा पोलिसांनी अटक केले आहे

चणेरा येथील महाविद्यालयीन तरुणी आपल्या घरी जाण्यासाठी रोहा बस स्थानकामध्ये उभी होती तेथे आलिम आयुब कर्जीकर याने तिला सांगितले की मी सुद्धा चणेरा येथे चाललो असल्याने पटकन मी तुला चणेरा येथे सोडतो असे सांगून मोटार सायकल नंबर एम . एच . ०६ डिआर . ७२८० वर घेऊन म्हाडा कॉलनी येथे रोहा चणेरा रोडवरील सीएनजी पेट्रोल पंप पुढे आले असता आरोपी अलीम कर्जीकरने तरुणीला चॉकलेट देण्याचा प्रयत्न केला परंतु तीने तात्काळ गाडी थांबवण्यास सांगितले परंतु आरोपीने गाडीचा स्पीड वाढवला त्यामुळे आरोपीचा पळून नेण्याचा डाव असल्याचा लक्षात आल्याने नाईलाजाने त्या तिने स्वतःचा जीव वाचवण्यासाठी गाडीवरून उडी मारली व थेट रोहा पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला

रोहा पोलिसांनी आरोपीला अटक केल्याची माहिती पोलिसांनी दिलेली आहे .पुढील तपास रोहा पोलीस स्टेशनचे निरीक्षक मारुती पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली दाखल अंमलदार पोलीस हवालदार महेंद्र दामा शिंद व तपासीक अंमलदार स्वप्निल म्हात्रे करीत आहेत.

## माझे वन योजनेचा आज शुभारंभ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अलिबाग वन विभागातील अवनत वन क्षेत्राचे शासकीय निधीचा वापर न करता वनीकरण करण्यासाठी अलिबाग वन विभागाचे उप वनसंरक्षक राहुल पाटील यांच्या संकल्पनेतून माझे वन ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेचा शुभारंभ वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते जुमापट्टी, ता. कर्जत येथील राखीव वन कक्ष क्र. ५० अ येथे १ एकर अवनत क्षेत्रावर वृक्षारोपण करून गुरुवारी (दि.२२) करण्यात येणार आहे.

या योजनेमध्ये प्रत्येक कार्यरत वन कर्मचारी यांनी वन विभागाचे कार्यक्षेत्रातील वनांपैकी कोणतेही१एकर क्षेत्राची निवड करुन सन २०२५ चे पावसाळयांत,स्वेच्छेनेव स्वखर्चानेत्यांना वाटणारे वृक्षांची लागवड करावयाची आहे.

# मोटरसायकल अपघातात दोन जण जखमी

**खालापूर :** मुंबई पुणे जुन्या महामार्गावर खालापूर जंक्शन च्या पुढे पनवेलच्या बाजूला मोटारसायकल व कारच्या अपघातात २ जण गंभीर जखमीं झाले.

खालापूर सिएनजी पंप समोर अवघड वळणावर मोटारसायकल स्वाराचे अति वेगात नियंत्रण सुटल्याने त्याने समोर जाणाऱ्या कारला धडक मारली. यामधे अक्षय वाघमारे व ज्योत्स्ना अक्षय वाघमारे रा. घोडीवली वाडी खालापूर हे जखमी झाले .जखमींना एमजीएम रुग्णालय कामोठे येथे दाखल करण्यात आले आहे

## रोहा नगर परिषद

ता. रोहा, जि. रायगड पिन कोड नं. ४०२१०९
फोन नं. कार्यालय–०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४/२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/विद्युत/नि.सु/३१५/२०२५–२०२६ दिनांक : २१–०५–२०२५

### जाहीर निविदा सूचना

रोहा नगर परिषद रोहा यांजकडून रोहा नगर परिषदेच्या विद्युत विभागास खालील नमूद केलेल्या कामांसाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून निविदा दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | इसारा रक्कम (रुपये) | कोरी निविदा फॉर्म फी | काम पूर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दरमंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेच्या मालकिच्या इमारतींमधिल बातानिकुलित यंत्रणा व वॉटर कुलर विथ प्युरिफायर यांची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. | ५००० | ५०० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत |
| २ | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दरमंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेस विद्युत साहित्य पुरवठा करणे. | १०००० | १००० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत |
| ३ | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दरमंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेच्या मालकिच्या नदी संवर्धन गार्डन मधील वार्षिक विद्युत देखभाल व दुरूस्ती करणे | ५००० | ५०० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत |
| ४ | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेच्या डम्पिंग ग्राऊन्ड (क्षेपण भुमी) येथील वार्षिक विद्युत देखभाल व दुरूस्ती करणे | ५००० | ५०० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत |
| ५ | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दरमंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेच्या मालकिच्या ७.५ के.व्ही.ए. ४० के.व्ही.ए, २५० के.व्ही.ए. १५ के.व्ही.ए. जनरेटर्स यांची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे | ५००० | ५०० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत |

**निविदा अटी/शर्ती :–**

१) विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक २२–०५–२०२५ पासून ११–०६–२०२५ रोजीपर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करुन निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील.

२) याकामी बयाणा/इसारा रक्कम रोखीने दिनांक २२–०५–२०२५ पासून ११–०६–२०२५ रोजी पर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करावी.

३) विहीत निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोट्यात लखोटा क्र.१ व लखोटा क्र.२ सिलबंद करून दोन्ही लखोटे एका मोठ्या लखोठ्यामध्ये सिलबंद करून अशा लखोट्यावर करावयाचे कामाचे नाव ठळक अक्षरात नमूद करून मुख्याधिकारी, रोहा नगर परिषद, रोहा, यांचे कार्यालयात दिनांक २२–०५–२०२५ पासून ११–०६–२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी दाखल करता येतील.

४) निविदेतील दर हे जी.एस.टी. वगळून इतर करांसहित असावेत, बिलाची आकारणी करतेवेळी जी.एस. टी. अनुज्ञेय राहणार नाहीत

५) लखोटा क्रमांक १ उघडून निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी केली जाईल व पात्र अथवा अपात्र निविदा बाबत अभिप्राय नोंदविल्यानंतर केवळ पात्र निविदांचा लखोटा क्रमांक २ शक्यतो दिनांक ११–०६–२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा किंवा प्रशासकिय सोईनुसार निविदाधारकांसमोर किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींसमोर करणेत येईल

६) कोणतेही कारण नमुद न करुन अथवा असे कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.

७) विषयांकीत कामाचे देयक ठेकेदारास नगर परिषदेकडे जसा निधी उपलब्ध आसेल त्या प्रमाणात अदा करणेत येईल.

८) निविदे संदर्भात काही माहिती हवी असल्यास कार्यालयिन वेळेत नगर परिषद कार्यालयातील विद्युत विभागात संपर्क करून अथवा प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून माहिती घ्यावी.

सही/–
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा नगर परिषद**

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात नमूद केलेली सामायिक शेतजमिन मिळकत ही मालक **श्री. अरुण सहदेव थळी आणि श्री. गणेश पांडुरंग म्हात्रे व ईतर** यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशील यांनी ठरवलेला आहे व या व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. अरुण सहदेव थळी आणि श्री. गणेश पांडुरंग म्हात्रे व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या आशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

**मिळकतीचे वर्णन: मौजे सागरपालेखार (५५३३४०)**
**PU-ID: २२१००७५१४७८, तालुका उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमाक | मुधारणा पद्धत | क्षेत्र है. आर.चौ. मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १/२४<br>खाते क्रमांक ८१ | १ | ०.५.८०<br>पो.ख. ०.०.५० | ०.७० |
| | | **एकूण ०.६.३०** | |

या विक्रीस असलेल्या एकूण क्षेत्राचे **०.६.३० खरेदीखत**

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्का बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्या सह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्री पुरावास आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकलीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतिनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक असणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**दिनांक २२/०५/२०२५**

सही/–
**एड. निलेश झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस.ली भूखंड क्रमांक ३३/३४ सेक्टर २२ कामोठे
ता. पनवेल जि. रायगड–४१०२०९ मो.क्र–: ९९२०४ ७५८०१

## रोहा नगर परिषद

ता. रोहा, जि. रायगड पिन कोड नं. ४०२१०९
फोन नं. कार्यालय–०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४/२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/बांवि/ई–निविदा सुचना/३१४/२०२५ दिनांक : २१–०५–२०२५

### जाहीर ई– निविदा सूचना

रोहा नगरपरिषद हद्दीतील विकास कामाकरिता कामाचा अनुभव असणा–या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई–निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई–निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २२/०५/२०२५ रोजीपासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक २९/०५/२०२५ रोजीपर्यंत राहील.

सही/–
**मुख्याधिकारी**
**रोहा नगर परिषद**

# श्रीवर्धनमध्ये मुसळधार पाऊस; हवेत गारवा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



श्रीवर्धन तालुक्यात गेले काही दिवस उन्हाची तीव्र झळ जाणवत होती. दिवस असो वा रात्र, तापमानातील वाढ सतत जाणवत होती. दिवसाच्या उन्हामुळे अंगाची लाही लाही होत होती आणि रात्रीसुद्धा उष्णतेमुळे झोपेवर परिणाम होत होता. मात्र, बुधवारी सायंकाळी आलेल्या पावसाने या तापदायक वातावरणाला थोडा दिलासा दिला.

सायंकाळी साडेतीन वाजल्यापासून आकाशात मोठ्या प्रमाणावर काळेभोर ढग गोळा होऊ लागले. वातावरणात अचानक अंधार दाटला आणि क्षणभर सायंकाळी सात–आठ वाजल्यासारखा भास निर्माण झाला. साधारण चारच्या सुमारास पावसाने आपली हजेरी लावली आणि काही वेळातच मुसळधार पावसाने जोर पकडला.

सायंकाळी सहा वाजल्यापासून विजांचा कडकडाट आणि जोरदार पावसामुळे परिसरात गारवा निर्माण झाला. पावसाच्या या अचानक झालेल्या आगमनाने नागरिकांना थोडा दिलासा मिळाला असला तरी, शेती व पावसाळापूर्व तयारीची कामे थांबवावी लागली आहेत. पावसामुळे शेतकरी वर्ग साशंकतेत असून पुढील हवामानावर त्यांचे लक्ष लागून आहे. गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात उष्णतेची तीव्रता असह्य बनली होती. तापमानाने चाळिशी पार केली होती, आणि त्यामुळे उन्हाळ्याची झळ सर्वसामान्यांपासून शेतकरी, कामगार वर्गाला अधिक जाणवत होती. त्या पार्श्वभूमीवर आजच्या या पावसाने जरी थोडा गारवा निर्माण केला असला तरी, कामकाजाच्या दृष्टीने अडथळाही निर्माण केला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील काही दिवसांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भिसेगाव एसटी थांब्यावर महिला प्रवासी सुविधा केंद्राची निर्मिती

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत – कल्याण राज्यमार्गावर कर्जत रेल्वे स्थानका नजिक असलेल्या भिसेगाव एस टी थांब्यावर महिला प्रवासी सुविधा केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. महिलांसाठी सर्व सुविधानी युक्त असलेले हे केंद्र सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राज्य शासन हायटेक झाले असल्याचे स्पष्ट करणारे आहे.

महिलांचे विविध प्रॉब्लेम या सर्वांवर या सुविधा केंद्रात सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. रस्त्यावर असे पहिलेच केंद्र कर्जतमध्ये तयार करण्यात आले आहे. कर्जत शहरातील पश्चिम बाजूकडे रेल्वे स्थानका नजिक कर्जत – कल्याण राज्यमार्ग ७६ लगत भिसेगाव एस ती थांबा आहे. एस टी चे प्रवासी याच थांब्यावर उतरून इच्छित ठिकाणी जाण्यासाठी कर्जत रेल्वे स्थानकात जातात. याच थांब्यावर नवी मुंबई महापालिकेच्या बस सुद्धा थांबतात. त्यामुळे येथे नेहमीच गर्दी असते. तास दोन तास प्रवास करून आल्यावर या परिसरात स्वच्छतागृह नसल्याने प्रवशांची गैरसोय होते. पुरुष प्रवासी आपली सोय कुठेही करून घेतात मात्र महिलांची खूप गैरसोय होते. त्यामुळे येथे राज्य शासन व सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या मार्फत सुसज्ञ असे महिला सुविधा केंद्र उभारण्यात आले आहे.

राज्यामध्ये प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग या रस्त्यावर लगत महिलांसाठी सुविधा केंद्र बांधण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. राज्यतील पहिले महिला सुविधा केंद्र कर्जतमध्ये बांधण्यात आले आहे. शासनाच्या या विषेध मोहिमेंर्गत वुलू या आंतरराष्ट्रीय महिला सुविधा पूरविणाऱ्या कंपनीद्वारे तयार करण्यात आलेले हे रेडिमेड एअर कंडिशनर अस्पिरेशनल सेंटर आहे.




या सुविधा केंद्राचे वैशिष्ठ म्हणजे नाविन्यपूर्ण या संकल्पनेतून आकर्षक पद्धतीच्या सुविधा केंद्राचा पहिलाच प्रयोग रायगड जिल्ह्यात कर्जत मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने केला आहे.

आमदार महेंद्र थोरवे यांनी महिला सुविधा केंद्र उभे करण्यासाठी पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आणि पहिल्या महिला सुविधा केंद्राची निर्मिती झाली. सार्वजनिक बांधकाम विभाग कोकण विभाग अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण यांनी या सुविधा केंद्राच्या कामाकडे विशेष लक्ष दिले होते. अशी माहिती कर्जत उपविभाग उपअभियंता संजीव वानखेडे यांनी दिली.

## या केंद्रातून महिलांना मिळणाऱ्या सुविधा

**** महिलांकरिता स्वातंत्र्य टॉयलेट * बेबी केअर / चेंजिंग रूम * वॉल माउंटेड वॉशिंग बेसिन * पॅड वेंडिंग मशीन, पीपल काऊंटर * जेनीटर मॉनिटर * सी सी टीव्ही कॅमेरे * डस्टबिन * एअर फ्रेशनर मशीन * रिटेल स्टोअर आदी सुविधा आहेत.***



**माणगाव :** मंगळवारी संध्यकाळी झालेल्या जोरदार वादळात जुने माणगाव रेस्ट हाऊस जवळ पडलेल्या लाईटच्या पोलचे काम करून घेताना माणगांवचे माजी नगरसेवक सिराज परदेशी

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

### धोकादायक / अतिधोकादायक इमारतींबाबत जाहिर सूचना सन २०२५-२६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ ते २६८ मधील तरतुदी तसेच शासन संदर्भविसआ–२१५/ प्र.क्र. ३४९/नवि–२०, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१५ नुसार व त्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेने निश्चित केलेल्या कार्यपध्दती (एस. ओ.पी.) नुसार सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक व धोकादायक मिळकतीचे संबंधीत प्रभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले असुन, सर्वेक्षणाअंती प्रभाग समिती अ– १८, प्रभाग समिती ब–१५, प्रभाग समिती क– १०, प्रभाग समिती ड–३७ अतंर्गत एकुण ८० सी–१ या प्रवर्गात मोडणाऱ्या मिळकती जाहिर करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीतील रहिवाश्यांना त्यांच्या सदनिका रिक्त करण्याकरीता महानगरपालिकेकडून वेळोवळी नोटिसद्वारे कळविण्यात आलेले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच राज्य शासनाने धोकादायक मिळकतीबाबत करावयाची कारवाईचे अनुषंगाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार मुळ मालक / भोगवटादार यांना पुरेशी संधी देऊनही संबंधितांनी इमारत रिक्त करुन पाडण्याची कार्यवाही केली नाही तर या मिळकतीचा विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा खंडीत करणे व त्यानुसार मिळकती पोलीसांमार्फत निर्मनुष्य करुन पाडण्याची कार्यवाही मनपामार्फत करण्यात येते.

तथापी काही मिळकतीमध्ये अजुनही नागरीक वास्तव्यास आहेत. पुढील कालावधीत पावसाळा सुरु होणार असून अतिवृष्टी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे धोकादायक व अतिधोकादायक इमारतीतील नागरीकांनी त्या इमारती त्वरीत रिकाम्या करुन, निर्मनुष्य करुन, विना विलंब सदर अतिधोकादायक / धोकादायक इमारती स्वतःहुन सुरक्षितरित्या पाडण्याची कार्यवाही करावी. धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवीत व वित्त हानी झाल्यास त्या बाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या संबंधित नागरीकांची तसेच इमारतीचे मालक व भाडेकरु यांची राहील. त्याचप्रमाणे अतिधोकादायक मालमत्तांचे स्ट्रक्चरल ऑडीट (Structural Audit) करुन घेण्याची जबाबदारी संबंधित घरमालक / भोगवटादार यांची राहील. याकरीता महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. अशा मोडकळीस आलेल्या धोकादायक / अतिधोकादायक इमारतींची यादी महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळ (Website) प्रसिध्द करणेत आलेली आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांची जीवित व वित्त हानी टाळण्याच्या दृष्टीने जागरुक राहणे ही नागरीकांनचीही जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्वजण जबाबदार नागरीक म्हणुन आपआपल्या परिसरातील इमारतीवर लक्ष ठेवून भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने धोकादायक अतिधोकादायक इमारती निर्मनुष्य करुन सुरक्षित स्थळी आपण रहिवास हलवून सहकार्य करावे.

आपत्कालीन परिस्थितीत पुढील दुरध्वनी / Toll Free क्रमांकावर संपर्क साधावा.

**दूरध्वनी क्रमांक :– ०२२– २७४५८०४०/४१/४२**
Toll Free **क्रमांक :– १८००–२२७–७०१**

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/**
**प्र.क्र.२१४/२१७/२०२५**
**दिनांक :– २१/०५/२०२५**

**सही/–**
**(मंगेश चितळे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, पनवेल यांचे न्यायालयात

पत्ता : पहिला मजला, कृषि उत्पन्न बाजार समिती इमारत, रायगड बाजार जवळ, मार्केट यार्ड. पनवेल ४१०२०६.

(Tenancy Mannual, Form VIII)

**महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ पोटकलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस**

**३२ग दावा क्रमांक: टेनन्सी/एसआर/६/२०२५**

१. श्री. सदानंद जगन्नाथ पवार
२. संतोष जगन्नाथ पवार
रा. मु. लोणिवली, ता. पनवेल, जि.रायगड
३. श्रीम. अश्विनी अशोक चाळके
रा. मु. काशीद, ता. मुरुड, जि. रायगड
४. श्रीम. सुवर्णा पांडूरंग मोरे
रा. मु. वावर्ले, ता. खालापूर, जि. रायगड
५. श्रीम. राजश्री रविंद्र राणे
रा. रूम नं. १६. जी विंग, ३रा मजला,
सी.जे. मुनोत नगर, महात्मा फूले रोड,
जुना पोस्ट ऑफीस जवळ, पनवेल, जि. रायगड
६. श्रीम. मोहिणी यशवंत मोरे
रा. मु. होराळे, पो. वावोशी, ता. खालापूर, जि. रायगड
७. श्रीम. सुजाता मधुकर पालांडे
८. श्रीम. सत्यभामा जगन्नाथ पवार
रा.डोणे, पो. वांगणी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे
— अर्जदार /कुळ

**विरुध्द**

१. श्रीम. सविता कुमारी चोप्रा
रा. मु.पो. पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड
२. श्री. सदाशिव गणेश ओझे
रा. लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड
— सामनेवाले / (जमिनमालक)

**जमिनीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (सर्व्हे नं./गट नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | लोणिवली | १३७ | २ | ०–१२–६०<br>पो.ख. ०–००–००<br>एकूण ०–१२–६० | ०.२८ |

ज्याअर्थी जिल्हा रायगड, तालुका पनवेल, गाव लोणिवली यांतील वर निर्दिष्ट केलेल्या जमिनी...

तुम्ही

कृषिदिनी कुळ म्हणून करीत असल्याकारणाने, त्या महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ यांच्या ३२ व्या कलमान्वये तुम्ही खरेदी केल्या आहेत असे समजण्यांत येण्याचे योजिले आहे.

ज्या अर्थी आता तुम्हांस नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत द्यावयाची असल्यास तारीख ०३/०६/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता पनवेल येथे शेतजमिन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे तुम्ही हजर होण्यास कसूर कराल, तर त्याबाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यांत येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामात गैरहजेरीत सुरुवात करण्यांत येऊन गुणवत्तेवर निकाल दिला जाईल. तसेच सुनावणीचे तारखेनंतर ही नोटीस प्राप्त झालेस आपण ही नोटीस मिळालेनंतर ८ दिवसाचे आत इकडील कार्यालयात उपस्थित राहून सुनावणीची तारीख समक्ष घेऊन जावी. या अनुषंगाने फेरनोटीस काढली जाणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १९/०५/२०२५**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**रायगड अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, पनवेल**

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव दिपक फर्टिलायझर्स के–७, के–८, एम्प्लॉईज को ऑप क्रेडीट सोसायटी लि.तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड., असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २३/०५/२०२५ ते २९/०५/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. ३०/०५/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि.०३/०६/२०२५ ते १७/०६/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक २९/०६/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(सुरेखा पाटील)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

# जनतेच्या प्रश्नांसाठी मंत्री गणेश नाईकांचा जनता दरबार

## अधिकाऱ्यांना दिल्या तत्काळ कार्यवाहीच्या सूचना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे वनमंत्री मंत्री नामदार गणेश नाईक यांनी सोमवारी विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी नवी मुंबई येथे आयोजित जनता दरबारात नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. पाणीटंचाई, रस्त्यांची दुर्दशा, अपूर्ण गटारकामे, अनियमित कचरा व्यवस्थापन अशा अनेक समस्या उपस्थित नागरिकांनी या वेळी मांडल्या.

दरबारात सादर झालेल्या तक्रारींकडे गांभीर्याने लक्ष देत नाईक यांनी महापालिकेचे संबंधित अधिकारी, पाणीपुरवठा विभाग, आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश नाईक यांनी दिले.

जनता दरबारात मोठ्या ४०० नागरिक समस्या टोकन क्रमांक घेऊन उपस्थित होते. एका टोकन सोबत चार ते पाच त्यांचे सहकारी नागरिक असे दिड हजार नागरिक उपस्थित होते. काही प्रकरणांमध्ये नाईक यांनी थेट मोबाईलवर संबंधित



अधिकाऱ्यांना त्तर मागितले. यामुळे उपस्थित जनतेमध्ये समाधान आणि प्रशासनावर विश्वास निर्माण झाला.

घणसोली, नवी मुंबई येथील सिडको मेघमल्हार सोसायटीला सिडकोकडून रिफंड मिळणारा कोट्यवधीचा देखभाल खर्च अद्याप मिळाला नसल्याबाबत सोसायटीचे नवनिर्वाचित अध्यक्ष तुषार नाईक यांनी निवेदन दिले. गणेश नाईक यांनी सिडको अधिकाऱ्यांना या प्रकरणी चांगलेच धारेवर धरले.

जनतेचा हक्काचा फंड तुम्ही आत्तापर्यंत का दिला नाही. आता हा फंड लवकरात लवकर दिला नाही तर अधिकाऱ्यावर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे नाईक यांनी सिडको अधिकाऱ्यांना आपल्या शैलीत सांगितले. लोकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका. लोक मला प्रश्न विचारतात. त्यामुळे तुम्ही लवकरात लवकर थकित रक्कमेचा प्रश्न मार्गी लावा असे त्यांनी सांगितले.

याविषयी सिडकोच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दात सूचना देताना नामदार नाईक यांनी यासंबंधीचा कायदा समजून घेण्यास सांगितले. २०१५ पर्यंतच्या अनधिकृत बांधकामांना जर शासनाने अभय दिले असेल तर कारवाईच्या नोटिसा पाठवल्या कशा? असा सवाल त्यांनी अधिकाऱ्यांना विचारलं. त्यामुळे सिडकोने दिलेल्या नोटिसा मागे घेण्याचे निर्देश देतानाच सिडकोसह महापालिकेने देखील कोणत्याही प्रकारची कारवाई करू नये, असे आदेश त्यांनी दिले.

शहरातील सर्व फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करून शहरातील अधिकृत फेरीवाल्यांना परवाने द्यावेत. निराधारांसाठी निवारा केंद्र स्थापित करावीत. यासाठी सिडको महामंडळाकडून सुविधा भूखंड घ्यावेत, अशी सूचना त्यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना केली.

# शिरवणे-जुईनगरमध्ये रस्त्यावरील कामांचा नागरिकांना मनस्ताप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपा आयुक्त यांनी पावसाळा पूर्वी १४ मे २०२५ पूर्वी सार्वजनिक ठिकाणी चालू असलेली कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत, मात्र महानगर गॅस, रिलायन्स, नवी मुंबई मनपा यांच्या संबंधित ठेकेदारकडून शिरवणे गाव, जुईनगर तसेच नवी मुंबईतील इतर विभागातील रस्ते, फुटपाथ, गटारे, केबल टाकणे अशा विविध प्रकारची खोदकामे चालू आहेत. ही खोदकामे सुरू असल्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

शिरवणे गांव पूर्व विभाग ठिकाणी रस्त्यावरील महानगर गॅसच्या वतीने भूमिगत केबल टाकण्याचे काम संबंधित ठेकेदारकडून सुरु आहे. या कामांमुळे वाहतूक कोंडी तसेच नागरिकांना जीव मुठीत धरून रस्त्यावरून ये-जा करावी लागत आहे. खोदकांमाच्या बाजूलाच भाजीपाला मार्केट, विविध व्यवसायिक यांची दुकानें आहेत. तसेच नेरूळ रेल्वे स्थानकांकडे जाणार हा रस्ता



असल्याने नेहमीच नागरिकांची वर्दळ असते. तसेच बाजूलाच निवासी संकुल असल्यामुळे रस्त्याने लहान मुलांची ये-जा असते रस्त्यावरून जाताना एखाद्या व्यक्तीचा अपघात होण्याची दाट शक्यता आहे. तसेच परिसरामध्ये धूळ कामाचा आवाज याने नागरीक त्रस्त आले असून महानगर गॅसच्या कामावर नाराजगी व्यक्त करत आहे.

तसेच जुईपाडा गांवमधील अंतर्गत रस्त्यावरील खोदकाम आणि फुटपाथचे काम अद्याप सुरू आहे. जुईनगर सेक्टर २५ मध्ये रस्त्याचे खोदकाम सुरूच असल्याने प्रभागातील नागरिकांनी नाराजगी व्यक्त केली आहे. इथं अनेक

**नवी मुंबई मनपा प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी संबंधित ठेकेदार यांच्याकडून होत असलेली कामे पूर्ण करावीत. सामान्य नागरिकांना याचा त्रास होऊ नये याची दक्षता घ्यावी.**
**-सिद्धार्थ साळवी, नागरिक**

महिन्यांपासून सदर काम सुरु असून खोदकामाचा नाहक त्रास सामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे नवी मुंबई पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी ही कामे लवकरात लवकर करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## निवडक

### अहिल्या होळकर कार्यशाळा



**नवी मुंबई :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त भाजपा, नवी मुंबई जिल्ह्याचा वतीने शिरवणे विद्यालय आणि जुनियर कॉलेज नेरूळ येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जाज्वल इतिहास कार्यशाळेचे आयोजन मंगळवारी जिल्हा अध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले होते. या कार्यशाळेला भाजपा प्रदेश सरचिटणीस व विधान परिषद आमदार विक्रांत पाटील यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होऊन कार्यशाळेला संबोधीत केले. या वेळी नवी मुंबई जिल्ह्यातील सर्व आजी माजी भाजप पदाधिकारी, माजी नगरसेवक, मंडळ अध्यक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्वामींच्या मठाचा वर्धापन दिन

**उरण :** शहरातील आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा संघ यांच्या वतीने श्री स्वामींच्या मठाचा ७ वा वर्धापन दिन शुक्रवार (दि.६) जून रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असे श्री स्वामी समर्थ सेवा संघ कार्यकारी मंडळ अध्यक्ष शेखर म्हात्रे यांनी सांगितले आहे. या दिवशी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.

### सिंगर परिवारास मदतीचा हात

**उरण :** समर्थ चषक आयोजक (पिरकोन उरण) येथून भिवंडी विभागातील शहापूर तालुक्यातील वालशेत वाडीतील सुप्रसिद्ध आदिवासी गायक स्वर्गीय बाल्या सिंगर यांच्या घरी जाऊन समर्थ चषक क्रिकेट ग्रुपतर्फे दहा हजार रुपये चेक स्वरूपात त्याची पत्नी श्रीमती वैशाली बाल्या डेरे आणि त्यांची मुले यांना देण्यात आला तसेच उरण तालुका महिला सदस्य बिंदू गावंड यांच्याकडून साडी भेट देण्यात आली. या वेळी आयोजक तथा उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी सरपंच व विद्यमान सदस्य अमित पाटील, उरण पूर्व विभाग अध्यक्ष संदीप गावंड, आवरे पंचायत गण अध्यक्ष अजित पाटील, उरण ओबीसी सेल सचिव प्राचार्य प्रमोद म्हात्रे आणि युवा नेतृत्व हर्षद भुरे उपस्थित होते.



# नवी मुंबईत अनेक ठिकाणी ‘अवकाळी’

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरात मंगळवारी (दि.२०) दुपारपासून वादळी वाऱ्याना सुरुवात झाली. संपूर्ण नवी मुंबईत ढगाळ वातावरण तयार झाले होते.सायंकाळी विजांच्या कडकडाटात पावसाला सुरुवात झाली. या अचानक आलेल्या पावसाने नागरिकांचीदेखील त्रेधा उडालेली पाहायला मिळाली.

नवी मुंबईत अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने व जोरदार वाऱ्याने नुकसान झाले. अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्यादेखील तुटून पडल्या. काही ठिकाणे वीजदेखील गेल्याने महावितरणला अनेक तक्रारी प्राप्त झाल्या. पाऊस पडल्याने काही ठिकाणी अंदाज न आल्याने मोटार सायकलस्वार घसरले. नवी मुंबई पालिकेनेदेखील तातडीने खबरदारी बाळगण्याचे आवाहन केले. नागरिकांची मात्र त्रेधा उडालेली पाहायला मिळाली. पावसामुळे झाडे, घरांची कौले, छप्परातून धुळीचे पाणी पडत होते. पावसाचा बचाव करताना ही धुळीचे पाणी अंगावर पडू नये यासाठीदेखील नागरिकांना बचाव करताना दिसले.

सध्या तापमान ४० ते ४२ डिग्री झालेले आहे. उन्हाच्या झळांनी नागरिक हैराण झाले आहेत. उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. असे असताना सोमवारी झालेल्या पावसाने काहीसा दिलासा नवी मुंबईकरांना मिळाला. उष्णता कमी झाल्याने नागरिकांनी टेरेस, परिसरात फिरून काहीशा थंड वातावरणाचा आनंद लुटला.

# ऑपरेशन सिंदूरच्या सन्मानार्थ नवी मुंबईमध्ये तिरंगा रॅली उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय सैन्याचा पराक्रम संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार गणेश नाईक यांनी केले.

सामर्थ्यवान भारतीय सैन्याचे कौतुक करण्यासाठी नवी मुंबईमध्ये तिरंगा रॅलीचे आयोजन नामदार गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आले होते. दहशतवाद्यांनी माता-भगिनींचे कुंकू पुसले आणि म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय सैनिकांच्या मोहिमेला ऑपरेशन सिंदूर हे नाव दिले. पाकिस्तान विरोधात राबविण्यात आलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या यशाची माहिती देशाच्या कानाकोपर्यात पोहोचण्याच्या उद्देशाने, राष्ट्रीय एकता आणि तिरंगा ध्वजाचा सन्मान वाढवण्याच्या दृष्टिकोनाने ही तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली होती.

वाशी सेक्टर २८ येथील ब्लू डायमंड हॉटेल येथून तिरंगा रॅलीचा शुभारंभ झाला. राष्ट्र



प्रेमाने ओसंडून वाहणाऱ्या या तिरंगा रॅलीमध्ये माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्यासह लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि राष्ट्रप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तिरंगा रॅलीदरम्यान भारत मातेचा जयजयकार करण्यात आला. रॅलीदरम्यान संपूर्ण परिसर देशाच्या अभिमानाचे प्रतीक तिरंगा ध्वजाने फुलून गेला होता.

# प्लास्टिकमुक्त नवी मुंबईसाठी दंडवसूलीची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने प्लास्टिकमुक्त नवी मुंबई संकल्पपूर्तीसाठी व्यापक जनजागृती सोबतच प्रतिबंधात्मक प्लास्टिक वापराला आळा बसावा यादृष्टीने एकल वापर प्लास्टिक विरोधी कारवायाही करण्यात येत आहेत. १ मे पासून १९ मे पर्यंत २१ दुकाने / आस्थापना यांच्यावर कारवाई करीत १ लक्ष ५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली असून १०३ किलो ४०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिक साहित्य जप्त करण्यात आले आहे.

या प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवायांमध्ये परिमंडळ १चे उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्या नियंत्रणाखाली परिमंडळ १च्या भरारी पथकाने सहा दुकाने आस्थापना यांच्याकडून ३० हजार दंडात्मक वसूली तसेच ५८ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक साहित्य जप्त केले आहे.

अशाचप्रकारे परिमंडळ २ चे उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली परिमंडळ भरारी पथकाने १५ दुकाने / आस्थापना यांच्याकडे प्रतिबंधात्मक



प्लास्टिक आढळल्याने ७५ हजार दंडात्मक रक्कमेची वसूली तसेच ४५ किलो ४०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला आहे.

सेक्टर १ कोपरखैरणे भागात केलेल्या तपासणी मोहीमेत प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळल्याने त्यांच्याकडून पाच हजार दंडात्मक रक्कमेची वसूली करण्यात आली असून एक किलो प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या आहेत.

१६ मे रोजीही से.२ कोपरखैरणे येथील एका दुकानात प्लास्टिक पिशव्या आढळल्याने तसेच १५ मे रोजी से.१२ बोनकोडे येथे हार्डवेअरच्या दुकानात प्लास्टिक पिशव्यांचा वापर सुरू असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांच्याकडील प्रत्येकी एक किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करून प्रत्येकी पाच हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

प्लास्टिकमुक्त नवी मुंबई प्रत्यक्षात साकारण्यासाठी नवी मुंबईकर नागरिकांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असून नागरिकांनी प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर पूर्णपणे बंद करून कागदी व कापडी पिशव्यांचा वापर करावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# नेरूळ येथे तिरंगा पदयात्रा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष, नवी मुंबई जिल्हा यांच्या माध्यमातून आमदार मंदा म्हात्रे, डॉ. राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेशन सिंदूर’ अंतर्गत भारताच्या अत्यंत शूर सैन्य दलांनी पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे नष्ट करून भारतातील माता - भगिनींचे सिंदूर पुसणाऱ्या क्रूर अतिरेक्यांवर भारतीयांना अपेक्षित असा सूड उगवला आहे.

भारताच्या शक्तिशाली सैन्य दलाला नमन करण्यासाठी आणि भरघोस समर्थन देण्यासाठी नेरूळ येथे रविवारी तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक सेक्टर १ नेरूळ पूर्व येथून या तिरंगा पदयात्रेची सुरुवात झाली व छत्रपती शिवाजी महाराज पुतळा जवळ सेक्टर ११ नेरूळ पूर्व येथे समापन करण्यात आले.

या वेळी नवी मुंबई युवा भाजप अध्यक्ष दत्ता घंगाळे, माजी नगरसेवक काशिनाथ पाटील, दीपक पवार, युवती सेल प्रमुख सुहासिनी नायडू, भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## क्लिक...क्लिक...!



**उरण : मुंबई येथील ससून डॉकला पर्याय म्हणून करंजा बंदर निर्माण झाल्याने येथील मच्छिमारांना मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे.**

# पावसाळी हंगामासाठी मोरा-मुंबई भाऊचा धक्का जलप्रवास महागणार

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

मोरा-मुंबई भाऊचा धक्का या जलमार्गावरील प्रवासी वाहतूक तिकीट दरात २६ मे पासून पावसाळी हंगामासाठी २५ रुपयांची वाढ करण्यात येणार असल्याने पावसाळी हंगामासाठी दरवाढ होणार असल्याने हा जलमार्ग प्रवास ८० रुपयांवरून १०५ रुपयांपर्यंत पोहोचणार आहे.दरवर्षी पावसाळी हंगामात मोरा - मुंबई भाऊचा धक्का या जल मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकीट दरात भरमसाठ वाढ केली जाते.

यंदाच्या वर्षीही मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेने पावसाळी



हंगामासाठी तिकीट दर ८० रुपयांवरून थेट १०५ रुपयांपर्यंत वाढविले आहे. त्याच प्रमाणे हाफ तिकीटही ३९ रुपयांवरून ५२.५० रुपयांपर्यंत म्हणजेच १३.५० रुपयांनी वाढविण्यात येणार आहे.ही तिकीट दरवाढ २६ मे पासून ३१ ऑगस्ट लागू करण्यात येणार असल्याची माहिती मुंबई जलवाहतूक संस्थेचे सेक्रेटरी शराफत मुकादम यांनी दिली आहे. या दरवाढिची मंजुरी मेरिटाईम बोर्डाकडून याआधीच घेतली असल्याचे मोरा बंदर निरीक्षक नितीन कोळी यांनी सांगितले.

मोरा - मुंबई भाऊचा धक्का हा जलमार्ग प्रवास फायदेशीर,सुखद आणि सोपा म्हणून ओळखला जातो.वाहतूक कोंडीची दगदग नसल्याने या जल मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे.याशिवाय दरवर्षी पावसाळी हंगामात गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा - अलिबाग, मुंबई भाऊचा धक्का ते रेवस या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूकही बंद ठेवण्यात येते.मांडवा अलिबागकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोरा - मुंबई भाऊचा धक्का या सागरी मार्गांवर गर्दी वाढते.

# पावसातही खोपोलीत तिरंगा यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**खोपोली : प्रतिनिधी**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याच्या भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उध्वस्त करून समाचार घेतला. त्या अनुषंगाने ऑपरेशन सिंदूर या लष्करी मोहिमेतील भारतीय सशस्त्र दलाच्या अतुलनीय शौर्याचा गौरव करण्यासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाचा सन्मान करण्याच्या उद्देशाने आज मंगळवार २०मे रोजी खोपोली शहरात भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली.

भर पावसात ही या तिरंगा यात्रेद्वारे खोपोली शहर व खालापूर तालुक्यातील नागरिकांनी आपल्या वीर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आणि भारतीय लष्कराच्या शौर्याला सलाम केला. हातात तिरंगा ध्वज, मनात राष्ट्राभिमान आणि भारत माता की जय, वंदे मातरम् जयघोष करत खोपोली शहर व खालापूर तालुक्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यावेळी माजी सैनिक प्रकाश महाडिक,माजी सैनिक रमाकांत मोदी, माजी सैनिक उत्तम शिंदे तसेच भाजपा जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, महिला जिल्हा अध्यक्षा अश्विनीताई पाटील,खालापूर तालुका अध्यक्ष सनी यादव, खोपोली शहर अध्यक्ष राहुल जाधव , नागेश पाटील, खालापूर तालुका महिला अध्यक्षा सुजाता ताई दळवी, खालापूर शहर अध्यक्ष दिपक जगताप,यशोदा मोरे,विकास रसाळ, विशाल लोते, ज्ञानेश्वरपारंगे, शेखर जांभळे, राजेंद्र फक्के ,रामभाऊ पवार,महिला मोर्चा अध्यक्षा अश्विनी अत्रे,विकास नाईक ,दिलीप पवार ,हेमंत नांदे ,संजय म्हात्रे ,अजय इंगुळकर ,ऋषी म्हात्रे ,महेश खेडेकर ,आपर्ण साठे ,सुप्रिया नांदे ,सुमिता महर्षी ,भारती शाह ,रुपेश मिस्त्री ,भावेश लोखंडे ,सचिन कुडपाणे ,रवींद्र जैन व इतर विविध संघटनेचे पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ आरएमएचा तिरंगा रॅलीत सहभाग

**कर्जत :प्रतिनिधी**

पाकिस्तान समर्थित दहशतवादाविरुद्ध भारताच्या सुरू असलेल्या ऑपरेशन सिंदूरला पाठिंबा दर्शवण्यासाठी २० मे रोजी आयोजीत तिरंगा रॅलीत रायगड मेडिकल असोसिएशन(RMA) ने उत्साहाने सहभाग घेतला. या रॅलीत नागरिक, व्यावसायिक आणि विविध संस्था देशभक्तीच्या भावनेने एकत्र आल्या आणि भारतीय सैन्याच्या पाठिशी ठामपणे उभ्या राहिल्या आहेत .

या महत्त्वपूर्ण उपक्रमात आरएमएचे अध्यक्ष डॉ.आशुतोष कुळकर्णी, सचिव डॉ. प्रशांत गांगल, कोषाध्यक्ष डॉ. कुमार ओसवाल, संपादक डॉ. दिलीप सावळे, मुख्य आयोजन सचिव डॉ. भावेश ओसवाल, आयोजन समिती सदस्य डॉ निलेश म्हात्रे, डॉ. साजिद अधिकारी, डॉ. भोपतराव, डॉ. मनीष जैन तसेच असोसिएशनच्या सर्वात वरिष्ठ सदस्य डॉ. गीता काळे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

या उपक्रमात RMAच्या नेतृत्व आणि सदस्यांच्या उपस्थितीमुळे वैद्यकीय क्षेत्राची देशभक्ती व राष्ट्रीय सुरक्षेप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित झाली. रायगड मेडिकल असोसिएशन ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभागी असलेल्या आपल्या शूर सैनिकांना सलाम करते आणि देशाच्या सार्वभौमत्व व शांततेसाठी चालवलेल्या प्रत्येक प्रयत्नामध्ये त्यांच्यासोबत ठामपणे उभी आहे.




# बॉक्साईट उत्खननाने श्रीवर्धनचा निसर्ग होतोय उद्ध्वस्त



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणच्या निसर्ग संपन्न प्रदेशांपैकी एक असलेला श्रीवर्धन तालुका सध्या विनाशाच्या मार्गावर आहे. निसर्गाने समृद्ध, ५२ किलोमीटर लांबीच्या समुद्रकिनाऱ्याने सजलेला हा भाग हरिहरेश्वर, दिवेआगर, जंजिरा किल्ला अशा पर्यटनस्थळांसाठी प्रसिद्ध आहे. मात्र सध्या या निसर्गरम्य भूमीत चाललेले बेकायदेशीर आणि बेशिस्त बॉक्साईट उत्खनन पर्यावरणावर, स्थानिक जीवनशैलीवर आणि पर्यटन व्यवसायावर गंडांतर आणत आहे.

कुरवडे गावाजवळ चाळीस वर्षांपूर्वी बॉक्साईट साठ्याचा शोध लागल्यानंतर काही प्रमाणात उत्खनन करण्यात आले. मात्र २००८ साली आशापुरा माईनकेम लिमिटेड कंपनीने या भागात मोठ्या प्रमाणात बॉक्साईट उत्खनन सुरू केले. रॉयल्टीपेक्षा खूपच जास्त प्रमाणात खनिज काढून ते परदेशात पाठवले गेले. यामध्ये सरकारची फसवणूक झाल्याचेही निष्पन्न झाले होते. २०१४ मध्ये भाजपा सरकार आल्यानंतर हे उत्खनन थांबले, पण आता पुन्हा नव्याने मोठ्या प्रमाणात बॉक्साईट उत्खनन सुरू झाल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे.

खनिज उत्खननाच्या कायद्यानुसार, उत्खननानंतर खड्डे बुजवून त्या ठिकाणी वृक्षलागवड करणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात कोणतीही कंपनी ही जबाबदारी पार पाडताना दिसत नाही. स्फोटकांच्या साहाय्याने खोल खणले गेलेले खड्डे पावसाळ्यात पाण्याने भरून धोकादायक ठरू शकतात. कोकणात मुसळधार पावसाचा अनुभव पाहता, केरळमधील वायनाडप्रमाणे भूस्खलनाची शक्यता नाकारता येत नाही.

स्थानिक ग्रामस्थांनी वेळोवेळी विरोध नोंदवला असला तरी काही गावपातळीवरील नेत्यांना हाताशी धरून, प्रशासन आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने कंपन्यांना मोकळे रान मिळत आहे.श्रीवर्धन तालुक्यातील बहुतांश नागरिक पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास आणि निसर्गाचे नुकसान हे भविष्यातील पर्यटनावर गंभीर परिणाम घडवू शकतात. रोजगाराच्या संधी कमी झाल्यास बेरोजगारी वाढण्याची शक्यता आहे.

सध्या तरी पावसाळ्यामुळे उत्खनन थांबले असले तरी पावसाळ्यानंतर पुन्हा उत्खनन सुरू होणार हे निश्चित आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तसेच पर्यावरण व खनिज खात्याचे मंत्री यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून, कायद्यानुसार चौकशी व कारवाई करावी, अशी जोरदार मागणी श्रीवर्धन तालुक्यातील नागरिक करत आहेत.

निसर्गाची होणारी हानी, स्थानिकांचा वाढता विरोध, आणि कायद्याचे होणारे उल्लंघन लक्षात घेता, श्रीवर्धनमध्ये बॉक्साईट उत्खननाचा प्रश्न केवळ एक पर्यावरणीय समस्या नसून तो सामाजिक, आर्थिक आणि कायदेशीर गुंतागुंतीचा विषय झाला आहे. वेळेत उपाययोजना न केल्यास हा तालुका एक उध्वस्त भूभाग होण्याची भीती आहे.

## बलात्कार करणाऱ्याविरोधात कारवाईची मागणी

**माणगाव : बातमीदार**

संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली आणि शिवश्री वैभव सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली संभाजी ब्रिगेड रायगड जिल्हा व महाड तालुका यांनी महाड तालुक्यामध्ये नुकत्याच घडलेल्या माणुसकीला काळीमा फासणारा एका ५ वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचाराविरोधात संबंधित नराधम विलास हुलालकर रा. वरंडोळी याच्यावर लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ यांतर्गत फास्ट ट्रॅकवर खटला चालवून नराधमास फाशीची शिक्षा देण्यात यावी यासाठी संबंधित प्रशासनाला निवेदन दिले. दरम्यान, या मोर्चामध्ये महाड पोलादपूर तालुका भोई समाज पदाधिकारी तसेच बहुजन समाज उपस्थित होता.

मागील काही वर्षात महाराष्ट्रासह रायगड जिल्ह्यामध्ये सुद्धा महिला व बालमुलींवर लैंगिक अत्याचार, शोषण, बलात्कार, किडनॅपिंग असा अतिशय निंदनीय घाणेरडा प्रकार घडावा ही अतिशय खेदाची आणि लज्जास्पद गोष्ट आहे. त्यामुळे ही गंभीर बाब लक्षात घेऊन यावर योग्य ती कार्यवाही तत्काळ करून तसेच हा प्रकार पुन्हा घडू नये यासाठी योग्य त्या उपाय योजना करून पीडित चिमुरडीस योग्य तो न्याय द्यावा अन्यथा उचित आणि योग्य ती कारवाई न झाल्यास आम्ही आमच्या संभाजी ब्रिगेड स्टाईल योग्य ती कारवाही करू याची दक्षता घ्यावी आणि यास संबंधित रायगड जिल्हा प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी अशी विनंती वजा सूचना संबंधित सर्व प्रशासकीय विभागाला करण्यात आली.

## निजामपूर विभागातर्फे ना.भरत गोगावले यांचा भव्य सत्कार

**माणगाव : बातमीदार**

शिवसेनेचे कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांचा महाड मतदार संघातील निजामपूरविभागातर्फे रविवार दि. १८ मे रोजी सायंकाळी निजामपूर येथे भव्य सत्कार करण्यात आला

. यावेळीभरतशेठ गोगावले यांनी राष्ट्रवादी पक्षाचे खा.सुनील तटकरे तसेच मंत्री आदीती तटकरे यांचे नाव न घेता विरोधकांवर जोरदार टीका करताना सांगितले की, आम्ही लोकसभेला इमानदारीत वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करून रायगड मधून युती सरकारच्या उमेदवाराचे काम केले. त्यांनी मात्र विधान सभेला आम्हाला पाडण्याचे षडयंत्र



रचले होते.हे त्यांचे षडयंत्र माझ्या मावळ्यानी हाणून पाडले.

त्यांनी पुढे बोलताना सांगितले की येणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समित्या,जिल्हा परिषद निवडणुका आपल्याला ताकीदने लढायच्या असून कार्यकत्याने आता पासूनच कामाला लागावे. फक्त मुंबईकरांना आमची विनंती असेल गांवाला येऊन भावकी गावकीचे राजकारण करून नये, पक्ष संघटना देईल त्याच उमेदवाराला सहकार्य करावे.महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच लाडक्या बहिणीचे पैसे मंजूर केले, एसटीमध्ये महिलांना हाफ तिकीट,तसेच ७५ वर्षावरील महिला पुरूषांना मोफत तिकीट,लेक लाडकी या सर्व योजना एकनाथ शिंदे यांनी मंजूर केल्या असून तुमच्या समोर त्या खात्याचा कोण येईल आणि म्हणेल की मी केले तर त्याचा काही संबंध नाही

यावेळी कुंभार्ते,सांगी आणिसाळवेगावातील राष्ट्रवादीच्याकार्यकर्त्यांचा शिवसेनेतजाहीर पक्ष प्रवेश झाला.व्यासपिठावर प्रमोद घोसाळकर,अरुण चाळके,अॅड्. राजीव साबळे,विपुल उभारे, अॅड.महेंद्रमानकर,अविनाश नलावडे,रमेश मोरे,राजाभाऊ रणपिसे,संदीप जाधव, विलास शिंदे,संजय शिंदे, गणेश समेळ, हमजा जालगावकर उपस्थित होते.

## माथेरानमध्ये अवकाळी पावसाची जोरदार हजेरी

**माथेरान : बातमीदार**

महाराष्ट्रात सर्वत्र अवकाळी पावसाची जोरदार बॅटिंग सुरू असून मंगळवारी सायंकाळी माथेरान शहराला देखील अवकाळी पावसाने चांगलेच झोडपले आहे.मुसळधार पावसात पर्यटकांची मात्र मोठी तारांबळ झाली.

महाराष्ट्राच्या अनेक भागाला अवकाळी पावसाने चांगलेच झोडपले असून माथेरान पर्यटनस्थळी पण मंगळ्वार २० मे रोजी सायंकाळच्या सुमारास अवकाळी पावसाने मोठी हजेरी लावून शहराला झोडपून काढले यावेळी विजेच्या कडकडाटासह ढगांच्या गडगडाटात पडणाऱ्या पावसामुळे स्थानिक नागरीक तसेच पर्यटक यांची मोठी त्रेधातिरपीट उडाली. वादळी वाऱ्यासह येथे मेघगर्जना करत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे



काही ठिकाणी झाडे पडली असून माथेरान शहराचा वीज पुरवठा वारंवार खंडित होत होता.सुरळीत वीज पुरवठा नसल्याने याचा परिणाम दुसऱ्या दिवशी पाणी पुरवठ्यावर झाला.सध्या पर्यटन हंगाम सुरू असल्याने भरपूर प्रमाणावर पर्यटक माथेरान शहरामध्ये आहेत.अश्या परिस्थितीत देखील स्थानिक नागरिक आणि येथील व्यावसायिक पर्यटकांना योग्य सेवा सुविधा देत आहेत.

## मच्छीमार होड्या, मचवे किनाऱ्याला लागण्यास सुरुवात

**तळा : प्रतिनिधी**

तळातालुक्याला खाडी किनारी भाग लाभला असून मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांच्या होड्या, मचवे किनाऱ्याला लागण्यास सुरुवात झाली आहे.

१ जून पासून मासेमारीबंदी लागू होणार असून कोळीबांधव आपल्या होड्या, मचवे कीनाऱ्याला लावत आहेत. त्याच बरोबर अनेक कोळीबांधव आपल्या होड्यांची डागडुजी व दुरूस्ती करून घेत आहेत व मासेमारीसाठी लागणारी जाळे विणत आहेत.काही जाळे दुरूस्ती ची कामे करत आहेत.



यावर्षीच्या वातावरणीय बदलांमुळे मासेमारीवर परिणाम झाला होता. त्यावेळी मासे कमी मिळत होते.परिणामी अर्थिक नुकसान होत होता. आता नौका किनाऱ्याला लावल्या जात आहेत.

वाशीहवेवली,रहाटाड, मजगाव,रोवळा, मांदाड,कुडे, गिरणे या किनारी भागात मासेमारी केली जाते.मासेमारी बंदीचा कालावधी संपल्यानंतर मोठ्या जोमाने मासेमारी करण्यासाठी हे कोळीबांव व मासेमारी करणारे तयारीत राहणार आहेत.

सध्या होड्या,मचवे किनार्याला लागले जात असून होड्यांची डागडुजी,जाळे विणणे व दुरूस्तीची कामे सुरू आहेत.

## चारित्र्यावर संशय घेतल्याने पत्नीने केला पतीचा खून

**पाली : प्रतिनिधी**

तालुक्यात काही दिवसांपूर्वीच एका प्रियकराने आपल्या प्रेयसीचा खून करून स्वतः देखील आत्महत्या केली होती. ही घटना ताजी असतानाच सुधागड तालुक्यातील नाडसूर येथील कोंडगाव ठाकूरवाडी येथे चारित्र्यावर संशय घेतल्याने पत्नीने पतीचा लोखंडी रॉडने मारून खून केला आहे.

शनिवारी (ता. १७) रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास घडली व गुन्हा नोंद रविवारी (ता.१८) पहाटे ५:५५ ला करण्यात आला आहे. हिरा हंबीर हिचा पती सादुराम ताया हंबीर हा तिच्यावर चारित्र्याच्या संशय घेऊन भांडण करत होता.

या भांडणावरून राग मनात धरून हिरा हिने लोखंडी अँगलने सादुराम याच्या चेहऱ्यावर, कपाळावर, डोक्यावर व डोक्याच्या मागे मारहाण करून गंभीर दुखापत केली. या मारहाणी मध्ये सादुराम हंबीर याचा मृत्यू झाला आहे.

## काळकाई मातेचा गोंधळ, पालखी सोहळा

**मुरुड: प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील डोंगरी सुभा ग्रामस्थांची ग्रामदेवता काळकाई मातेचा गोंधळ व पालखी सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. उदो उदो काळकाई मातेच्या नावानं चांग भलं गजरात संपुर्ण परिसर दुमदुमून गेला.

यावेळी विनोद पुलेकर, रविंद्र सतविडकर,भुषण भोसले,शुभम भोसले,संतोष नाईक,नयन सतविडकर, डोंगरी सुभाचे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ नाईक, मंगेश पुलेकर, उपाध्यक्ष संजय भोसले,सचिव शेखर डपे,सचिन नाईक,राजेश सतविडकर, मनोज सतविडकर आदिंसह जय कालिका माता महिला मंडळ जय हनुमान क्रीडा मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



निसर्गमय डोंगरात असणारी व नवसाला पावणारी ग्रामदेवता काळकाई मातेचा मंदिर असुन या उत्सवानिमित्त मंदिराला विद्युत रोषणाईनी सजावट केली होती.सकाळपासुन विविध धार्मिक विधीनी सुरुवात झाली देवीचा माड सजवुन ग्रामस्थांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने पुजा करण्यात आली यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.महिलांनी देवीची ओटी भरुन मनोभावे दर्शन घेऊन नतमस्तक होत आर्शिवाद घेतले.

या तीन दिवसीय देवीच्या गोंधळ कार्यक्रमा निमित्य श्री सत्यनारायण महापूजा दुसऱ्या दिवशी ढोलताशांच्या गजरात काळकाई मातेची पालखी भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.तसेच देवीला गाऱ्हाणे.नवस फेडणे,महाप्रसाद , शैक्षणिक, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते यावेळी शेकडो भक्तगणांनी हजेरी लावली होती.

# राजस्थानचा चेन्नईवर थरारक विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२५ मधील अखेरच्या सामन्यात विजय मिळवत आपल्या मोहिमेचा चांगला शेवट केला. राजस्थानने २ षटकं बाकी ठेवत ६ विकेट्सने चेन्नई सुपर किंग्स संघावर विजय मिळवला. यासह राजस्थान रॉयल्सने यशस्वीपणे विजयाचे लक्ष्य दुसऱ्यांदा पार केले. ध्रुव जुरेलने आपल्या षटकारांच्या जोरावर संघाला अखेरीस विजय मिळवून दिला आणि आपली फिनिशरची भूमिका चोख बजावली.







राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्जचा ६ विकेट्सने पराभव करून शानदार विजय मिळवला. या हंगामात राजस्थानचा हा चौथा विजय आहे. हे दोन्ही संघ आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत आणि गुणतालिकेत तळाशी आहेत. त्यामुळे या सामन्याचा निकाल प्लेऑफच्या शर्यतीवर परिणाम करणार नाही, पण गुणतालिकेत दोन्ही संघाच्या प्रतिष्ठेचा मात्र प्रश्न होता.

चेन्नई सुपर किंग्सने दिलेल्या १८८ धावांचा पाठलाग करताना राजस्थानची सुरुवात चांगली झाली. यशस्वी जैस्वालने १९ चेंडूत १८९.४७ च्या स्ट्राईक रेटने ३६ धावा केल्या. ज्यामध्ये ५ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. तर वैभव सूर्यवंशीने संथ सुरूवातीनंतर ३३ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५७ धावा करत सामना एकतर्फी केला. दुसरीकडे, कर्णधार संजू सॅमसनने ४१ धावांचे योगदान दिले. त्यानंतर ध्रुव जुरेलने १२ चेंडूत नाबाद ३१ धावा करत राजस्थानला विजय मिळवून दिला.

राजस्थानने संपूर्ण सामन्यात उत्कृष्ट सांघिक कामगिरी करत चेन्नई संघावर दबाव कायम ठेवला. या सामन्यात राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, हा निर्णय संघाच्या पथ्यावर पडला. चेन्नईने फक्त १२ धावांत २ विकेट गमावल्या. यानंतर, आयुष म्हात्रेने वादळी खेळी खेळली आणि पॉवरप्लेमध्ये वेगाने धावा केल्या. पण राजस्थानच्या गोलंदाजांनी सामन्यात पुनरागमन केलं.

आयुष म्हात्रेने २० चेंडूत ८ चौकार आणि १ षटकारासह ४३ धावा केल्या. त्याने २१५ च्या स्ट्राईक रेटने धावा करत संघाचा चांगली सुरूवात करून दिली. यानंतर, डेवाल्ड ब्रेव्हिसने २५ चेंडूत ४२ धावा केल्या आणि संघाला मोठ्या धावसंख्येकडे नेले. शिवम दुबेनेही ३९ धावा केल्या, ज्यामुळे सीएसके संघ २० षटकांत ८ गडी गमावून १८७ धावा करू शकला.

# रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा आठ सामन्यात विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५ स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने चांगली कामगिरी केली आहे. आतापर्यंत खेळलेल्या १२ सामन्यापैकी आठ सामन्यात विजय मिळवला आहे. तर एक सामना ड्रॉ झाल्याने एक गुण पदरात पडला.



आरसीबी संघ १७ गुण आणि +०.४८२ नेट रनरेटसह दुसऱ्या स्थानावर आहे. आता उर्वरित दोन सामने सनरायझर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स या संघांसोबत आहेत. जर हे दोन्ही सामने जिंकले तर आरसीबीचा संघ गुणतालिकेत टॉप २ मध्ये राहील. २३ मे रोजी सनरायझर्स हैदराबाद आणि २७ मे रोजी लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध सामने होणार आहे. असे असताना २७ मे पूर्वी संघात दिग्गज गोलंदाजाचे पुनरागमन होणार आहे.

आरसीबीचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड उर्वरित सामन्यांसाठी भारतात परतणार आहे. भारत-पाकिस्तान युद्धाच्या भीतीमुळे आयपीएल स्थगित झाल्यानंतर हेझलवूड मायदेशी गेला होता. तसेच दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात खांद्याला दुखापत झाल्याने हेझलवूड चेन्नईविरुद्धच्या सामन्यात खेळला नव्हता.

जोश हेझलवूड रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघात पुढील रविवारी म्हणजेच २५ मे रोजी संघात सामील होणार असल्याची माहिती आहे.

## कोल्हापूर येथे होणार राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

क्लासिक पुरुष व महिला राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा-२०२५ कोल्हापूर येथे होणार आहे. ही स्पर्धा राजमाता जिजाऊ दीक्षांत हॉल, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या ठिकाणी होणार आहे. या स्पर्धेला डी वाय पाटील प्रतिष्ठानचे पाठबळ लाभले आहे.

ही स्पर्धा महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन चे सचिव शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. या स्पर्धेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी कोल्हापूर जिल्हा पॉवरलिफ्टिंगचे सचिव डॉ. प्रशांत पाटील आणि त्यांचे सहकारी प्रा. विजय वडगावकर यांचेकडे असून या स्पर्धेसाठी भारतातून नामवंत खेळाडू २६ राज्यातून ३५२ पुरुष खेळाडू व २५६ महिला खेळाडू यांनी सहभाग नोंदविला आहे. त्याचबरोबर ४० आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय नामवंत या स्पर्धेस हजर राहणार आहेत. तसेच आपल्या महाराष्ट्रातील नामवंत पंच, पदाधिकारी सुद्धा हजर राहणार आहेत. यापूर्वी औरंगाबाद येथे राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धा जानेवारी २०२३ मध्ये आयोजित करण्यात आलेली होती.

कोल्हापूरच्या राष्ट्रीय स्पर्धे साठी ज्यांना आर्थिक मदत करावयाची आहे तर त्यांनी श्री सूर्यकांत गर्दे, खजिनदार महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग (९८६९७३६७११) यांच्याशी संपर्क साधावा, असे संजय सरदेसाई. सरचिटणीस, महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग असोसिएशनने कळविले आहे.

# राजस्थान रॉयल्सच्या यशस्वी जयस्वालचा आयपीएलमध्ये बोलबाला

## बनवला महारेकॉर्ड; सर्वाधिक धावा करणारा ठरला फलंदाज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्स संघ प्लेऑफमध्ये पोहचू शकला नाही, पण यशस्वी जयस्वालने यावर्षी शानदार फलंदाजी केली. जयस्वाल आयपीएल २०२५ मध्ये राजस्थानसाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. या हंगामात जयस्वालने १४ सामन्यांमध्ये ५५९ धावा केल्या. आयपीएल २०२५ च्या सीएसके विरुद्ध आरआर या ६२ व्या सामन्यात राजस्थानने चेन्नईचा सहा विकेट्सने पराभव केला.

या सामन्यात जयस्वाल मोठी धावसंख्या उभारू शकला नाही आणि ३६ धावा काढून बाद झाला. जयस्वालला फक्त ३६ धावा करता आल्या तरी त्याने त्याच्या छोट्या खेळीदरम्यान एक महान विक्रम रचण्याचा अद्भुत पराक्रम केला.



कोणता विक्रम त्याने रचला आहे याची आपण इत्यंभूत माहिती घेऊया.

या सामन्यात जयस्वालने १९ चेंडूत ३६ धावा केल्या. त्याने डावाच्या पहिल्याच चेंडूवर चौकार मारून आपल्या डावाची सुरुवात केली आणि आयपीएल २०२५ मध्ये त्याने असे करण्याची ही पाचवी वेळ आहे. आयपीएल २०२३ मध्येही त्याने डावाच्या पहिल्या चेंडूवर चौकार मारून चमत्कार केला आहे. जयस्वालने आयपीएलमध्ये आतापर्यंत पाच वेळा डावाच्या सुरुवातीलाच हा अनोखा पराक्रम केला आहे. त्याचबरोबर, आयपीएल हंगामात दोनदा हा पराक्रम करणारा जयस्वाल जगातील पहिला फलंदाज बनला आहे.

याशिवाय, यशस्वी जयस्वालने IPL च्या डावात पहिल्याच चेंडूवर चौकार मारण्याची ही १३ वी वेळ होती. त्याने सर्वाधिक वेळा असे करणारा फलंदाज म्हणून आपला विक्रम आणखी मजबूत केला आहे.

याशिवाय यशस्वीने आयपीएलमध्ये पहिल्याच बॉलवर सर्वाधिक चौकार लगावले असून यामध्येही रेकॉर्ड केला असल्याचे दिसून आले आहे. रॉबिन उत्थपा १०, क्विंटन डी कॉक ११, विराट कोहली ११ तर जयस्वीने १३ वेळा ही कामगिरी करत आपले वर्चस्व राखले आहे.

एवढेच नाही तर आयपीएल हंगामात पॉवरप्ले दरम्यान सर्वाधिक षटकार मारणारा जयस्वाल जगातील दुसरा फलंदाज बनला आहे. असे करून त्याने महान दिग्गज सनथ जयसूर्याच्या विक्रमाची बरोबरी केली आहे आणि ख्रिस गेलसारख्या स्फोटक फलंदाजाचा विक्रमही मोडला आहे. जयस्वालने आतापर्यंत आयपीएलच्या एका हंगामात पॉवर प्लेमध्ये एकूण २२ षटकार मारले आहेत.

सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, सीएसकेने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ८ गडी गमावून १८७ धावा केल्या, त्यानंतर राजस्थान रॉयल्स संघाने १७.१ षटकांत ४ गडी गमावून लक्ष्य गाठले. वैभव सूर्यवंशीने ३३ चेंडूत ५७ धावांची खेळी केली, त्याशिवाय संजू सॅमसन ४१ धावा करून बाद झाला. त्याच वेळी, राजस्थान रॉयल्सकडून तीन विकेट घेणाऱ्या आकाश माधवालला त्याच्या उत्कृष्ट गोलंदाजीसाठी सामनावीराचा किताब देण्यात आला.

# वैभव सूर्यवंशी धोनीच्या पाया पडला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२५च्या अखेरच्या सामन्यात शानदार विजय मिळवत मोहिमेचा शेवट केला आहे. राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्सचा ६ विकेट्स १७ चेंडू बाकी ठेवत शानदार विजय मिळवला. राजस्थानच्या या विजयात संपूर्ण संघाचं योगदान होते, पण वैभव सूर्यवंशीच्या फलंदाजीने सर्वांचं पुन्हा एकदा लक्ष वेधून घेतले, पण याशिवाय वैभवच्या कृतीमुळे सर्वच जण त्याचं कौतुक करत आहेत.



राजस्थान रॉयलसच्या गोलंदाजांनी पहिल्या डावात चेन्नईच्या फलंदाजांवर वचक बसवला आणि त्यांना २०० धावांपर्यंत पोहोचू दिले नाही. चेन्नईने प्रथम फलंदाजी करताना १८७ धावा केल्या. चेन्नईने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानने संथ सुरूवात केली. यशस्वीने एकाबाजूने फटकेबाजी केली, पण षटकारांची आतिषबाजी करणारा वैभव सूर्यवंशी शांत होता आणि त्याने या सामन्यात संथ सुरूवात करत नंतर आपलं रौद्ररूप दाखवले.

राजस्थानला विजयाच्या उंबरठ्यावर आणण्यात संजूबरोबर वैभवनेही मोठं योगदान दिलं. अखेरीस ध्रुव जुरेलने षटकारांची आतिषबाजी करत संघाला विजय मिळवून दिला आणि विजयासह मोहिमेची सांगता केली.

सामना संपल्यानंतर, जेव्हा दोन्ही संघांचे खेळाडू हस्तांदोलन करत होते, तेव्हा धोनी आणि वैभवही समोरासमोर आले. धोनी जवळ येताच, वैभवने एका हातो हस्तांदोलन करत धोनीच्या पायांना खाली वाकून स्पर्श केला आणि त्याचे आशीर्वाद घेतले. यानंतर, धोनीने वैभवकडे प्रेमाने पाहत त्याचे कौतुक केले आणि वैभवनेही निरागस स्मितहास्य दिले, वैभवच्या या कृतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि या क्षणाचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.

# ‘कार्लसन विरुद्ध विश्व’ लढत दीड महिन्यानंतर बरोबरीत

**बर्लिन : वृत्तसंस्था**

पाच वेळच्या जगज्ञेत्या मॅग्नस कार्लसनची १.४ लाख लोकांविरुद्धची बुद्धिबळ लढत अखेर बरोबरीत सुटली. ‘कार्लसन विरुद्ध विश्व’ असे नाव देण्यात आलेली ही लढत तब्बल ४६ दिवस चालली.



विश्वातील सर्वांत मोठे बुद्धिबळ संकेतस्थळ अशी ख्याती असलेल्या ‘चेस.कॉम’वर या ‘ऑनलाईन’ लढतीचे आयोजन करण्यात आले होते. कार्लसनने एक लाख ४३ हजार ४९६ जणांच्या ‘टीम वर्ल्ड’विरुद्ध ही लढत खेळली. कार्लसन या लढतीत बाजी मारेल असे भाकित ‘चेस. कॉम’ने केले होते. मात्र, अखेरीस कार्लसनला बरोबरीवर समाधान मानावे लागले.

‘कार्लसन विरुद्ध विश्व’ ही लढत ४६ दिवस चालली. ‘फ्री-स्टाइल’ पद्धतीने खेळल्या गेलेल्या या लढतीत कार्लसनला पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळण्याची संधी मिळाली. कार्लसन आणि ‘टीम वर्ल्ड’ला प्रत्येक चाल रचण्यासाठी २४ तासांचा अवधी होता. ‘टीम वर्ल्ड’मधील सदस्य प्रत्येक चालीसाठी मतदान करायचे आणि सर्वाधिक मते मिळालेली चाल खेळली जायची. ‘टीम वर्ल्ड’ने तीन वेळा कार्लसनच्या राजाला अडचणीत टाकले. कार्लसनला यातून मार्ग काढणे शक्य झाले नाही. तीन वेळा त्याच-त्याच चाली रचल्या गेल्याने अखेरीस लढत बरोबरीत सुटली.

**अशा प्रकारची तिसरी लढत**

‘जगज्ञेता बुद्धिबळपटू विरुद्ध विश्व’ अशी ही तिसरी लढत होती. याआधी १९९९ मध्ये रशियाचा दिग्गज ग्रँडमास्टर गॅरी कास्पारोवने ५० हजार लोकांविरुद्ध खेळताना विजय मिळवला होता. ही लढत ‘मायक्रोसॉफ्ट नेटवर्क’वर चार महिने चालली. गतवर्षी भारताचा पाच वेळचा जगज्ञेता बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंदने ७० हजार लोकांविरुद्ध खेळताना विजय मिळवला होता. यंदा कार्लसनला मात्र १.४ लाख लोकांविरुद्ध बरोबरीवर समाधान मानावे लागले.

# महाराष्ट्राच्या दिक्षा यादवला सागरी जलतरणात एक सुवर्ण, दोन कांस्य




**दीव : वृत्तसंस्था**

भल्या पहाटे रंगलेल्या पहिल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेतील सागरी जलतरणात दिक्षा यादवच्या कामगिरीमुळे महाराष्ट्राने स्पर्धेतील सुवर्ण सकाळ अनुभवली. १० मीटर स्विमथॉन प्रकारात महाराष्ट्राने दिक्षाच्या सुवर्णपदकासह २ कांस्यपदकांची कमाई केली. बीच पेंचक सिलटमध्ये देखील महाराष्ट्राने स्पर्धेतील पहिले सुवर्णयश संपादले. २ सुवर्णांसह ९ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्र पदकतक्यात तिसऱ्या स्थानावर आहे.

दीवच्या अरबी समुद्रात पहाटे ६ वाजता १० मीटर स्विमथॉनचा थरार रंगला. महिलांच्या गटात सुरूवातीपासून महाराष्ट्राच्या १९ वर्षीय दिक्षा यादवे मुसंडी मारली होती. २ मिनिटे १८.०९ सेकंद वेळेत शर्यतीचा पल्ला पार करीत दिक्षाने सुवर्णपदक पटकावले. रौप्य व कांस्य पदकांसाठी अनुक्रमे महाराष्ट्राच्या पूर्वा गावडे व तामिळनाडूच्या एम. आरना यांच्यात शर्यत रंगली. दोघींनीही एकाच वेळी अंतिम रेष पार केली. अवघ्या १४ दशांश सेकंदाने पूर्वाला रूपेरी यशाने हुलकावणी दिली. २.१८.३८ वेळ देत आरनाने रौप्य, तर २.१८.५२ वेळ नोंदवून पूर्वाने कांस्यपदक जिंकले.

साताऱ्यातील दिक्षा आणि सिंधूदुर्गच्या पूर्वा या दोन्ही खेळाडू पुण्यातील शासनाच्या क्रीडा प्रबोधिनीत सराव करतात. ५० मीटर फ्रीस्टाईल खेलो इंडिया विद्यीपीठ स्पर्धेतही दिक्षाने पदक जिंकले आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com